सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा


Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २५ मे २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ५३ | पाने : ८ | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## कोरोनाची पुन्हा एन्ट्री! मुंबई, दिल्लीसह देशात रुग्णसंख्येत वाढ; रुग्णालयांना अलर्ट जारी!



नवी दिल्ली : कोरोना पुन्हा एकदा भारतात शहरी भागांमध्ये डोके वर काढत आहे. दिल्ली, मुंबई, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि केरळसह अनेक राज्यांत रुग्णसंख्येत वाढ होताना दिसत आहे. यामुळे केंद्र सरकारने आणि स्थानिक प्रशासनांनी रुग्णालयांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत.

देशभरातील वाढती कोरोना आकडेवारी:

दिल्ली: २३ नवीन रुग्ण; तीन वर्षांतील ही पहिली मोठी नोंद. दिल्ली सरकारने बेड्स, ऑक्सिजन सिलिंडर, टेस्ट किट्स आणि लस स्टॉक सज्ज ठेवण्याचे आदेश दिले.

मुंबई: मे महिन्यात आतापर्यंत ९५ रुग्ण; यातील फक्त १६ रुग्ण रुग्णालयात दाखल. लक्षणे असणाऱ्यांना टेस्ट करण्याचे आवाहन.

ठाणे: तीन दिवसांत १० रुग्ण सापडले.

केरळ: मे महिन्यात २७२ रुग्णांची नोंद - देशातील सर्वाधिक. मास्क बंधनकारक; रुग्णालये अलर्ट मोडवर.

कर्नाटक: ३५ नवीन रुग्ण; एका ९ महिन्यांच्या बाळालाही लागण.

नोएडा-गाझियाबाद: नव्याने रुग्ण आढळले.

ही वाढ गछ.१ ओमिक्रॉन सब-व्हेरियंटमुळे होत असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. हा प्रकार सध्या जास्त गंभीर नसला, तरी लक्षणे सौम्य असून ताप, गळा खवखवणे, नाक वाहणे, थकवा, डोकेदुखी अशी सामान्य लक्षणे दिसत आहेत.

सतर्क राहा, पण घाबरू नका, असा सल्ला आरोग्य यंत्रणेकडून देण्यात येत आहे. प्रशासनांनी औषधांचा पुरेसा साठा ठेवला असून, इन्फ्लुएंझा आणि सिव्हियर रेस्पिरेटरी इन्फेक्शनची माहिती दररोज अपलोड करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. सूचना: लक्षणं आढळल्यास त्वरित टेस्ट करून घ्या, मास्क वापरा आणि गर्दी टाळा.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भाजप कार्यकर्त्यांनी तयार राहा - फडणवीस

सांगली : राज्यात कार्यकाळ संपुष्टात येऊनही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रतिक्षित आहेत. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांनंतर आता सर्वच राजकीय पक्षांना त्याचे वेध लागले आहेत. त्या अनुषंगाने तयारी देखील सुरू आहे. दरम्यान आता खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये मनपा आणि अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाजप कार्यकर्त्यांनी तयार राहा, असे आदेश दिले आहेत. तसेच जिथे निवडणुका जिंकाल तिथे मोठ्या प्रमाणावर निधी देऊ, असे आश्वासन देखील दिले आहे. ते सांगलीत भाजप



कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते.

स्थानिक स्वराज्य संस्था सरकारच्या ताब्यात असल्या की काम चांगलं होतं, नाहीतर विकासाला खीळ बसते. त्यामुळे कार्यकर्त्यांना कामाला लागा, सप्टेंबर ऑक्टोबरमध्ये निवडणुका जाहीर होतील. जिल्हा परिषद, नगरपालिका निवडणुका एकत्र होतील किंवा ५-६ दिवसांचं अंतर असेल. त्यानंतर १५ दिवसांनी महानगरपालिकेच्या निवडणुका असतील, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयाने ६ मे रोजी राज्य सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात महत्वाचे निर्देश दिले होते. चार महिन्यांच्या आत रखडलेल्या निवडणुका घ्या. न्यायालयाच्या या आदेशानंतरच आता राज्य निवडणूक आयोग या निवडणुका घेण्यासाठी सक्रिय झाला आहे.

## आला रे मान्सून आला, राज्यात कधी बरसणार?

नवी दिल्ली : उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांसाठी आनंदाची बातमी. मान्सूनचे केरळमध्ये आगमन झाले आहे. यंदा मे महिन्यात मान्सून केरळमध्ये पोहोचला आहे. केरळमध्ये लवकर आगमन झाल्यामुळे महाराष्ट्रातही पाऊस लवकर येण्याची शक्यता आहे. मान्सूनचा प्रवास वेगाने सुरू राहिला तर राज्यात आठवड्याभरात मान्सूनचे आगमन होण्याची शक्यता आहे.

मागील दोन चार दिवसांपासून राज्यात अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस पडत आहे. यामुळे शहरी भागांमध्ये उकाड्यापासून थोडा दिलासा मिळाला आहे. पण शेतकऱ्यांना फटका बसला आहे. मान्सून आता केरळात दाखल झालाय. त्यामुळे मान्सून महाराष्ट्रात केव्हा बरसणार आहेत याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. गोवा, कर्नाटक आणि केरळमध्ये वळवाचा पाऊस सुरु आहे. यंदा मान्सून आठवडाभर लवकरच येणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता. हा अंदाज खरा ठरला आहे.

केरळात दाखल झालेला मान्सून हा दक्षिण आणि मध्य अरबी समुद्र, मालदीव आणि कोमोरिन क्षेत्र, लक्षद्वीपचा काही भाग, कर्नाटक, तामिळनाडू, दक्षिण आणि मध्य बंगालचा उपसागर या भागात पुढे सरकणार आहे. दक्षिण कोकण-गोवा किनाऱ्यावरील पूर्व मध्य अरबी समुद्रावर कमी दाबाचा पट्टा निर्माण झालाय. त्यामुळे पश्चिम किनारपट्टीच्या काही भागात पाऊस आणि वारा यामध्ये बदल होऊ शकतो असा अंदाज हमावान खात्याने वर्तवलाय. आता पुढील साधारण ७ ते ८ दिवसांत म्हणजेच ६ जूनच्या आसपास मान्सून महाराष्ट्रात पोहण्याचा अंदाज आहे. कोकण किनारपट्टी, मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्गसारख्या भागांत प्रथम पाऊस पडेल. यंदा मान्सूनच्या पावसाचं प्रमाणही सरासरीएवढं किंवा त्यापेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.

मान्सूनचा प्रवास पाहता कोकणानंतर तो दहा जूनपर्यंत मराठवाडा आणि विदर्भात पोहोचू शकतो, असा अंदाज वर्तवण्यात आलाय. यंदा तर शाळा सुरू होण्यापूर्वीच मान्सूला सुरुवात झालीय. त्यामुळे पावसातून जाताना दप्तर भिजणार नाही याची काळजी विद्यार्थ्यांना घ्यावी लागणार आहे.

## बियाणे खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी भरारी पथके

### कृषी विभागाची खते, बियाण्यांवर करडी नजर

पालघर : शेतकऱ्यांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण कृषि निविष्ठा (बियाणे, खते, कीटकनाशके) उपलब्ध व्हावीत, तसेच बियाणे खतांचा काळाबाजार होऊ नये यासाठी कृषि विभागामार्फत जिल्हास्तरीय एक आणि तालुकास्तरीय आठ अशी एकूण नऊ भरारी पथके पालघर जिल्ह्यात गठित करण्यात आली आहेत.

शेतकऱ्यांना बी- बियाणे विक्री करताना बनावट कंपन्यांची बियाणे विकणे, खताची साठवणूक करून काळाबाजार करणे, बियाणे कीटकनाशकांच्या विक्रीत फसवणूक करणे अशा अनेक तक्रारी दरवर्षी शेतकऱ्यांकडून केल्या जातात. त्यामुळे शेतकऱ्यांची कोणत्याही प्रकारे फसवणूक होऊ नये सोबतच त्यांना दर्जेदार बियाणे, खत, कीटकनाशके उपलब्ध व्हावीत यासाठी भरारी पथक नेमण्याचे आदेश कृषी आयुक्तालयाकडून देण्यात आले आहेत. त्यानुसार पालघर जिल्ह्यात भरारी पथक नेमण्यात आले आहेत. जिल्हास्तरीय भरारी पथकाचे प्रमुख म्हणून कृषि विकास अधिकारी सोमनाथ पिंजारी हे असणार आहेत. या पथकात विश्वास बर्वे, ए.जे. राऊळ , काकासाहेब भालेकर आणि लक्ष्मण लामकाने यांचा समावेश आहे.

तसेच प्रत्येक तालुक्यात तालुका कृषि अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली तालुकास्तरीय भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकांमध्ये तालुका कृषि अधिकारी (पथक प्रमुख), तर कृषि अधिकारी (तालुका कार्यालय), निरीक्षक वजने व मापे, मंडळ कृषि अधिकारी आणि गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक (पंचायत समिती) यांचा समावेश आहे.

## पाकिस्तानी उड्डाणांना भारतीय आकाशात नो एंट्री, भारताने २३ जूनपर्यंत वाढवली बंदी

नवी दिल्ली : भारत-पाकिस्तान यांच्यातील तणावादरम्यान भारत सरकारने पाकिस्तानची विमाने आणि सैन्य उड्डाणांवर आपल्या हवाई क्षेत्रातील बंदी २३ जून पर्यंत वाढवली आहे. हा निर्णय गेल्या महिन्यात पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर घेण्यात आला. या हल्ल्यात २६ निर्दोष नागरिकांना आपला जीव गमवावा लागला होता.

शुक्रवारी नागरी उड्डाण मंत्रालयाच्या निर्देशानुसार नवीन नोटीस जारी करण्यात आली. यानुसार पाकिस्तानच्या कोणत्याही एअरलाईन्सच्या उड्डाणांना भारतीय आकाशा प्रवेश दिला जाणार आहे. यात सैन्याच्या विमानांचाही समावेश आहे.

पाकिस्तानने वाढवली होती बंदी

हे पाऊल अशा वेळेस उचलले जेव्हा दोन दिवसांपूर्वी मीडिया रिपोर्ट्समध्ये दावा करण्यात आला होता की पाकिस्ताननेही सर्व भारतीय विमानांना आपल्या एअरस्पेसची बंदी एक महिन्यांनी वाढवली होती.

पाकिस्तानने पहिल्यांदा २३ एप्रिलला भारतीय विमानांसाठी एअरस्पेस बंद केले होते. पहलगाम हल्ल्यानंतरचा तो दिवस होता.

काय सांगतात नियम?

आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण संघटनेच्या नियमानुसार एअरस्पेसवरील बंदी अधिकाधिक एक महिन्यांसाठी लावता येते. त्यानंतर पुन्हा रिन्यू करावी लागते. भारताने पाकिस्तानच्या विमानांना बंदी मेमध्ये जाहीर केली होती. यात पाकिस्तानच्या सर्व विमानांवर बंदी घालण्यात आली होती. भारताने ही बंदी लावत स्पष्टपणे दाखवले होते की जोपर्यंत सीमेवर दहशतवाद बंद होत नाही तोपर्यंत हवाई संपर्कही शक्य नाही.

## भारताला स्वसंरक्षणाचा पूर्ण हक्क, ऑपरेशन सिंदूरवर भारताला मिळाला जर्मनीचा पाठिंबा

नवी दिल्ली: दहशतवादाविरुद्ध लाँच केलेल्या भारताच्या सिंदूर ऑपरेशनला जर्मनीने पाठिंबा दिला आहे. जर्मनीचे परराष्ट्र मंत्री जोहान वेडफुल यांनी सांगितले की दहशतवादाविरुद्ध भारताला आपले संरक्षण करण्याचा पूर्ण अधिकार आहे. यासोबतच त्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला.

ते म्हणाले, आम्ही २२ एप्रिलला भारतावर झालेल्या क्रूर दहशतवादी हल्ल्याने स्तब्ध झालोत. नागरिकांवर झालेल्या या हल्ल्याची आम्ही निंदा करतो. आमच्या संवेदना पीडितांसोबत आहेत. भारताला निश्चितच



दहशतवादाविरुद्ध स्वत:चा बचाव करण्याचा पूर्ण अधिकार आहे.

काय म्हणाले एस जयशंकर?

मी पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या भारताच्या प्रतिक्रियेनंतर लगेचच बर्लिनला आलो आहे. भारत दहशतवाद कधीच सहन करणार नाही. भारत कधीही अण्वस्त्र धमकीला बधणार नाही आणि भारत पाकिस्तानसोबत पूर्णपणे द्विपक्षीय पद्धतीने व्यवहार करेल. या संबंधात कोणत्याही प्रकारचा भ्रम नसला पाहिजे. आम्ही जर्मनीच्या भूमिकेलाही महत्त्व देतो. प्रत्येक देशाला दहशतवादाविरुद्ध स्वत:चे संरक्षण करण्याचा अधिकार आहे.






## सस्ती अदालत उपक्रमातून ५६० शेतरस्ते व पाणंद रस्ते मोकळे

छत्रपती संभाजीनगर, २४ मे : मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते तसेच पाणंद रस्ते मोकळे करण्यासोबतच प्रलंबित प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी छत्रपती संभाजीनगर विभागामधील सर्व तालुक्यात सस्ती अदालत उपक्रम सुरू आहे. विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या उपक्रमामुळे समूपदेशनातून तब्बल ५६० शेतरस्त्यांची प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली आहेत. प्रशासन थेट बांधावर पोचल्याने शेतरस्ते मोकळे करून देण्यात यश आले आहे.

राज्यातील जे शेतरस्ते, पाणंद रस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्यात यावेत. शेतजमिनीमध्ये वहिवाट करण्यासाठी अस्तित्वात असलेले रस्ते काही ठिकाणी अरुंद आहेत. अशा ठिकाणी मोठी वाहने जाण्यास अडचण निर्माण होऊन तक्रारही होतात. राज्यातील सर्वच शिवपाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्चित करून त्यांची कामे दर्जेदाररीत्या पूर्ण करावी, शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर महसूल प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही करावी, शेत वहिवाट रस्त्याची तक्रार सुनावणी तहसीलदार यांच्याकडे होते. अशी रस्त्यांबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे एका महिन्यात निकाली काढावीत. असे स्पष्ट आदेश राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

महसूलमंत्री बावनकुळे यांच्या सूचनेनुसार मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील गरजू नागरिक शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते व पाणंद रस्ते मोकळे करण्यासोबतच जलद न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी शासनाच्या सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रत्येक माहिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शुक्रवारी शक्यतो तहसिल कार्यालयात किंवा गरजेनुसार मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी सस्ती अदालत या नावाने हा उपक्रम सुरू आहे.

विभागात ९ मे रोजी प्रथम सस्ती अदालत व २३ मे रोजी दुसरी सस्ती अदालत तहसिल कार्यालयात तसेच गरजेनुसार मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी घेण्यात आली. सस्ती अदालतीमध्से काही प्रकरणात प्रत्यक्ष बांधावर जाऊन स्थळ पाहणी करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त गावडे यांनीदेखील अदालतीमध्ये ऑनलाईन सहभागी होत नागरीकांशी संवाद साधला.

छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या संकल्पनेतून कमी खर्चात आणि कमी वेळात शेतकऱ्यांचे रस्ते मोकळे करून देण्याची सस्ती अदालत योजना परिणामकारक ठरते आहे. शेतकरी हिताच्या दृष्टिकोनातून दोनशे रुपयात शेताच्या हद्दीची मोजणी या निर्णयाला गती देण्यासाठी विभागीय आयुक्त गावडे यांनी विभागातील आठही जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांची दूरदृष्यप्रणालीद्वारे विभागीय आयुक्त यांनी बैठक घेतली आहे.

सस्ती अदालतीमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रकरणे प्राप्त झाली असून त्यामधील बऱ्याच प्रकरणात समुपदेशन करुन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

जी प्रकरणे बऱ्याच कालावधीपासुन प्रलंबित होती अशा प्रकरणांमध्ये देखील समुपदेशन करुन सामंजस्याने प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये आठही जिल्ह्यात आयोजित सस्ती अदालतीमध्ये एकुण १२८० प्रकरणे प्राप्त झाली असून त्यापैकी ५६० प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. उर्वरीत प्रकरणात देखील यापुढील सस्ती अदालतीमध्ये समुपदेशन करुन सामंजस्याने प्रकरणे निकाली काढण्यात येत असल्याचे विभागीय प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## छत्तीसगडमध्ये ३३ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण, सरकार करणार पुनर्वसन

बिजापूर: छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात नक्षलविरोधी मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. येथे ३३ नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले आहे, त्यापैकी २४ जणांवर तब्बल ९० लाखांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. आत्मसमर्पणाचे कारण माओवादी विचारसरणीबद्दलचा भ्रमनिरास, आदिवासींवरील अत्याचार आणि सरकारच्या पुनर्वसन योजनांचा प्रभाव सांगितला जात आहे. गेल्यावर्षी २०२४ मध्ये, एकट्या बस्तरमधून तब्बल ७९२ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. या आत्मसमर्पित नक्षलवाद्यांनी आता हिंसाचार सोडून समाजाच्या मुख्य प्रवाहात परतण्याचा निर्णय घेतला आहे.

या माओवाद्यांमध्ये पीएलजीए कंपनी क्रमांक २ चे उपकमांडर, माड डिव्हिजन कंपनी क्रमांक ७ पीपीसीएम, एसीएम/पीपीसीएम, एलओएस कमांडर, सीएनएम अध्यक्ष, केएमएस अध्यक्ष आणि केकेबीएन डिव्हिजन पक्ष सदस्य असे अनेक उच्चपदस्थ नेते समाविष्ट आहेत. हे सर्वजण बऱ्याच काळापासून विजापूर, सुकमा आणि आसपासच्या भागात सक्रिय होते आणि अनेक नक्षलवादी घटनांमध्ये सहभागी होते.

आत्मसमर्पण आणि पुनर्वसन धोरणांचा फायदा

राज्य सरकारच्या आत्मसमर्पण आणि पुनर्वसन धोरणामुळे प्रभावित होऊन या नक्षलवाद्यांनी हे पाऊल उचलल्याचे विजापूरचे पोलिस अधीक्षक डॉ. जितेंद्र कुमार यादव यांनी सांगितले. रस्ते बांधकाम, वीज-पाणी सुविधा, शिक्षण आणि आरोग्य सेवा यासारख्या विकासकामांमुळे नक्षलवाद्यांना मुख्य प्रवाहात परत येण्याची प्रेरणा मिळाल्याचे यादव यांनी सांगितले. आत्मसमर्पण कार्यक्रमाला केंद्रीय राखीव पोलिस दलाचे (उठझऋ) उपमहानिरीक्षक राकेश कुमार, विजापूरचे एसपी डॉ. जितेंद्र कुमार यादव, कोब्रा आणि सीआरपीएफ बटालियनचे कमांडंट, एएसपी ऑपरेशन, जिल्हा राखीव गार्ड (ऊठॠ), बस्तर फायटर आणि एसटीएफ अधिकारी उपस्थित होते. या ऑपरेशनमध्ये डीआरजी, बस्तर फायटर, एसटीएफ, सीआरपीएफ आणि कोब्रा दलांनी विशेष योगदान दिले आहे.

माओवाद्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची प्रोत्साहन रक्कम

सरकारच्या आत्मसमर्पण धोरणाअंतर्गत, सर्व २४ माओवाद्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची प्रोत्साहन रक्कम देण्यात आली आहे. याशिवाय, त्यांना पुनर्वसन, रोजगार आणि शिक्षणाच्या सुविधा देखील दिल्या जातील जेणेकरून ते सामान्य जीवन सुरू करू शकतील.

यावर्षी १ जानेवारीपासून विजापूर जिल्ह्यात एकूण २२७ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे, २३७ माओवाद्यांना अटक करण्यात आली आहे आणि ११९ माओवादी मारले गेले आहेत. या आकडेवारीवरून असे दिसून येते की सरकारचे धोरण आणि सुरक्षा दलांची रणनीती नक्षलवादाच्या विरोधात प्रभावी ठरत आहे. एसपी डॉ. जितेंद्र कुमार यादव यांनी इतर माओवाद्यांनाही आत्मसमर्पण करून सरकारच्या पुनर्वसन धोरणाचा फायदा घेण्याचे आणि हिंसाचार सोडून समाजात शांततेत राहण्याचे आवाहन केले आहे.




# खरीप पीक कर्जाचे उद्दीष्ट वेळेत पूर्ण करावेत- जिल्हाधिकारी

२

## जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या आढावा बैठकीत दिल्या सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मे**

सर्व बँकानी योग्य नियोजन करुन सन २०२५-२६ च्या खरीप पीक कर्जाचे जास्तीत जास्त वितरण करुन वेळेत उद्दिष्ट पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा अग्रणी बँकेचे प्रमुख जिल्हा व्यवस्थापक पंकज बोरकर, आरबीआयचे अधिकारी अरुण बाबू, एसबीआय ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेचे संचालक हेमराज बनसोड, नाबार्डचे अविनाश लहाने, एसबीआय आरएसीसीचे व्यवस्थापक प्रमोद ढोले, विविध बँकेचे व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता म्हणाले, सन २०२४-२५ या वर्षात पीक कर्जाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे जिल्ह्यात बँकनिहाय पीक कर्ज वितरणाचा तपशील, पीक कर्जाचा केलेला परतावा, पीक कर्ज नूतनीकरण प्रकरणे याची तपशीलवार माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच चालू वर्षात खरीप पीक कर्जाचे ८७५ कोटी ९० लाखांचे उद्दिष्ट आहे. आतापर्यंत ९० कोटी ९२ लाखांचे वितरण झाले आहे. त्याची टक्केवारी १०.३८ टक्के इतकी आहे. यासाठी गावात शिबिराचे तसेच गावभेटीचे आयोजन करुन सर्व बँकांनी चालू वर्षात जास्तीत जास्त पीक कर्जाचे वितरण करुन वेळेत उद्दिष्ट पूर्ण करावेत. ज्या बँका उद्दिष्ट पूर्ण करणार नाहीत त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असे निर्देश दिले.

तसेच प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना, प्रधानमंत्री स्वनिधी, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, पशुसवंर्धन व मत्स्यव्यवसाय विभागाच्या योजना, किसान क्रेडिट कार्ड, बचतगट यासह विविध योजनेच्या प्रलंबित प्रकरणाचा तात्काळ निपटारा करावा. जिल्ह्यात मागणीप्रमाणे नवीन शाखा सुरु करण्याची कार्यवाही करावी किंवा बँक ग्राहक सेवा केंद्र सुरु करुन नागरिकांना सेवा उपलब्ध करुन द्यावेत, असे निर्देशही जिल्हाधिकारी गुप्ता यांनी दिले.

# नगर परिषदेच्यावतीने पूरस्थितीमध्ये बचाव प्रशिक्षण

## उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकाऱ्यांची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मे**

हिंगोली शहर व सभोवतालील ग्रामीण परीसरामध्ये मागील वर्षी माहे सप्टेंबर महिन्यामध्ये अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती उद्धवली होती, त्यानुसार यावर्षीच्या मान्सून मध्ये अशा प्रकारची पूरपरिस्थिती उद्धवल्यास परिस्थिती सक्षमपणे हाताळण्याकरिता मा.जिल्हाधिकारी श्री राहुल गुप्ता साहेब यांच्या सूचनेनुसार आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने, दिनांक २२ मे २०२५ रोजी उपविभागीय अधिकारी श्री समाधान घुटुकडे व मुख्याधिकारी श्री अरविंद मुंढे नगर परिषद हिंगोली यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशमन विभागामार्फत बोट चालवण्याचे व शोध, बचावाचे विशेष प्रशिक्षण औंढा ना येथील तलाव ठिकाणी आयोजित करण्यात आले होते.

यावेळी हिंगोली नगर परिषद अग्निशमन विभागातील कर्मचारी यांना शोध व बचाव प्रशिक्षण देण्यात आले तसेच संबंधित कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सराव करून घेतला. प्रशिक्षणादरम्यान सुरक्षेची सर्व आवश्यक माहिती व मार्गदर्शनही देण्यात आले. सदर प्रशिक्षण हे नगर परिषद श्रीरामपूर येथील अग्निशमन अधिकारी श्री.भागवत धायतडक, नगर परिषद परळी वै.येथील अग्निशमन अधिकारी श्री आदोडे यांच्या मार्फत देण्यात आले.

प्रशिक्षण दरम्यान उपविभागीय अधिकारी श्री. समाधान घुटूकडे, मुख्याधिकारी श्री अरविंद मुंढे, पोलीस निरीक्षक श्री.पडळकर तसेच पंचायत समिती, ग्राम पंचायत व अग्निशमन दलातील हिंगोली नगर परिषदेचे अग्निशमन अधिकारी श्री. अक्षय तांडेल हे उपस्थित होते.

# वसमत ग्रामीण हद्दीत हळद चोरी करणाऱ्यास केले जेरबंद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मे**

वसमत तालुक्यातील ग्रामीण भागात शेतकऱ्यांची हळद चोरी करणाऱ्या एका आरोपीस ग्रामीण ठाण्याच्या पथकाने जेरबंद केले आहे.

पोलिस स्टेशन वसमत ग्रामीण हद्दीत कवठा पाटी परिसरात खुदनापूर शिवारातील आखाड्यावरील वीस कट्टे हळद चोरी झाल्यासंदर्भाने पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास लावण्यासंदर्भाने पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी ठाणेदार गजानन बोराटे यांना सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने पोलिसांनी तपासादरम्यान तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीचा अभ्यास केला असता सदर चोरी ही नांदेड जिल्ह्यातील सुरज लक्ष्मण बोगरे व २० वर्ष राहणार लोंढे सांगवी याने त्याच्या साथीदारासह केल्याचे निष्पन्न झाले. पोलीस स्टेशन वसमत ग्रामीण येथील पथकाने आरोपी सुरज लक्ष्मण बोगरे यास ताब्यात घेतले असता आरोपीकडून चोरी मधील मुद्देमाल विक्री करून हिश्याला आलेले २५ हजार रुपये काढून दिले. पोलिसांनी सदर रक्कम जप्त करून सदर चोरीचा गुन्हा उघड करून आरोपी निष्पन्न केले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री राजकुमार केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार श्री गजानन बोराटे, पोउपनि संतोष मुपडे, पोलीस अंमलदार अविनाश राठोड, विजय उपरे,अजय पंडित, जयकुमार वराडे, नामदेव बेंगाळ. सायबरचे पोशि प्रदीप झुंगरे, मारोती काकडे यांनी केली.



**हिंगोली- येथीली भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांच्या अध्यक्षतेखाली भाजपची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, अमोल जाधव, कैलास काबरा, उमेश नागरे, के के शिंदे, अशोक ठेंगल, नारायण खेडकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

हिंगोली- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत इयत्ता दहावी व बारावी मध्ये जिल्ह्यातील शाळेमधून प्रथम आलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या मुलांमुलींसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार योजनेंतर्गत ५ हजार रुपये रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर थेट ऑनलाईन आधार संलग्न खात्यात जमा करण्यात येते. हिंगोली जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शाळेचे निकाल पत्र, शाळेचे शिफारसपत्र, दहावी, बारावीचे गुणपत्रक, जातीचा दाखला, बँक पासबूक छायांकित प्रत, आधार कार्ड आदी आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव शाळेच्या मुख्याध्यापकामार्फत सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाकडे सादर करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, हिंगोली यांनी केले आहे.

### राजेश्वर भालेराव यांचे अल्पशा आजाराने निधन



हिंगोली- जिजामाता नगरातील राजेश्वर शेषराव भालेराव गुंडेकर वय ४६ यांचे दि २३ मे रोज शुक्रवारी नांदेड येथील एका खाजगी रूग्णालयात उपचारा दरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले. ते तरूण भारतचे पत्रकार विजय गुंडेकर यांचे थोरले बंधु होत. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुलगे तसेच तीन भावंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे भालेराव परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला असून त्यांच्या पार्थिवावर शहरातील आदर्श महाविद्यालयाजवळील स्मशान भूमीत दि २४ मे रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

### आनंदराव मस्के यांना पदोन्नती



हिंगोली- जिल्हा पोलीस दलातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आनंदराव मस्के यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती झाली असून पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. पोलीस उपनिरीक्षक आनंदराव मस्के यांना यापूर्वी सन २०१८ मध्ये पोलीस महासंचालकाचे सन्मान चिन्ह बहाल केले होते तसेच त्यांना आतापर्यंत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल बद्दल ३७८ रिवार्ड बहाल केले आहेत त्याचप्रमाणे २६ जानेवारी २०२५ रोजी त्यांना राष्ट्रपती पदक ही बहाल करण्यात आले आहे. आनंदराव मस्के यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती झाल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# आ. मुटकुळेंकडून पंचायत समितीच्या नवीन इमारतीची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मे**

येथील पंचायत समितीच्या नवीन इमारतीचे काम पूर्ण झाले असून नवीन इमारतीची पाहणी भाजचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी केली.

येथील पंचायत समितीची इमारत अत्यंत जूनी झाल्यामुळे शासनाच्यावतीने नवीन पंचायत समिती कार्यालयासाठी कोट्यावधीचा निधी उपलब्ध झाला. मागील एक ते दीड वर्षापासून या इमारतीचे काम सुरू होते. सदरील काम आता पुर्ण झाले असून पंचायत समितीची इमारत आता उद्घाटनाच्या प्रतिक्षेत आहेत.

या इमारतीचे काम पाहण्यासाठी आ तान्हाजीराव मुटकुळे यांनी दोन दिवसांपूर्वी भेट दिली. यावेळी गटविकास अधिकारी यांनी संपूर्ण इमारतीचे बांधकाम तसेच त्याठिकाणी असलेल्या सोयीसुविधांबद्दल सविस्तर माहीती दिली.

यावेळी आ. मुटकुळे यांनी समाधान व्यक्त करीत या इमारतीमध्ये शेतकरी, नागरिक तसेच अधिकारी व कर्मचारी यांना न्याय मिळावा तसेच इमारत अत्याधुनिक आणि सुसज्ज बांधल्यामुळे समाधान व्यक्त केले आहे. या इमारतीचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेहस्ते होण्याची दाट शक्यता आहे. या इमारतीचे उद्घाटन लवकरात लवकर होऊन ती लोकांसाठी उपयोगात यावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# हिंगोली जिल्हा परिषदेची बदली प्रकिया सोमवारपासून

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मे**

हिंगोली जिल्हा परिषदेतील बदलीपात्र कर्मचाऱ्यांच्या बदल्या दि २६ मे सोमवारपासून दोन दिवस होणार असून बदली पात्र कर्मचाऱ्यांना समुपदेशनानंतर आदेश दिले जाणार आहेत. तर तालुकास्तरावरील बदल्या शासन निर्णयानुसार गटविकास अधिकाऱ्यांनी तालुकास्तरावरून पार पाडण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी दिल्या आहेत.

हिंगोली जिल्हा परिषदेत मागील काही दिवसांपासून बदली प्रक्रियेच्या हालचाली सुरू होत्या. यामध्ये जिल्हा परिषदेतील बदली पात्र कर्मचाऱ्यांकडून विनंती बदल्यासाठी अर्ज मागविण्यात आले होते. त्यानंतर प्रशासकीय बदल्यांसाठी कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता यादी तयार करण्यात आली होती. या यादीवर आक्षेप मागवून त्यानंतरच अंतिम सेवा ज्येष्ठता यादी जाहीर करण्यात आली. या यादीनंतर आता प्रत्यक्ष बदली प्रक्रिया राविण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी घेतला आहे.

त्यानुसार दि २६ मे सोमवारपासून ही प्रक्रिया सकाळी अकरा वाजता बांधकाम विभाग, दुपारी बारा वाजता लघुसिंचन विभाग, दुपारी एक वाजता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, दुपारी तीन वाजता कृषी विभागाच्या बदल्या होणार आहेत. दि २७ मे मंगळवारी अकरा वाजता अर्थ विभाग तर दुपारी एक वाजता सामान्य प्रशासन विभागाच्या बदल्या होणार आहेत. यामध्ये वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक, विस्तार अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सहाय्यक प्रशासन अधिकारी, महिला व बालकल्याण विभागातील पर्यवेक्षिका, बांधकाम विभागातील शाखा अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कृषी विभागातील विस्तार अधिकारी कृषी, पशु संवर्धन विभागातील पशुधन पर्यवेक्षक, अर्थ विभागातील कनिष्ठ लेखाधिकारी, वरिष्ठ लेखाधिकारी, लेखाधिकाऱ्यांच्या बदल्या होणार आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंतकुमार कुंभार, गणेश वाघ, केशव गड्डापोड यांच्या उपस्थितीत बदली प्रक्रिया होणार आहे.

# वसमत बस स्थानकाचे काम निकृष्ट, आ. नवघरेंनी केली कानउघाडणी



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २४ मे**

येथील बस स्थानकाच्या इमारतीसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे असे असताना बस स्थानकाचे काम हे पायाभरणीपासूनच निकृष्ट दर्जाचे सुरू आहे व अचानक नवघरे यांनी १९ मे रोजी वसमत बस स्थानकाच्या इमारतीचे होत असलेले काम पाहण्यासाठी गेले असता बांधकामाच्या पायाभरणी केलेल्या कामास तडे गेल्याचे निदर्शनास आले असता आ. नवघरे यांनी नाराजी व्यक्त करीत थेट संबंधित गुत्तेदारास फैलावर घेतले.

विविध सामाजिक संघटनांनी व राजकीय कार्यकर्त्यांनी निवेदने आंदोलने करूनही बस स्थानकाच्या इमारतीचे काम निकृष्ट दर्जाचे काम अधिकाऱ्यांनी थांबवले नाही. विविध वृत्तपत्रात निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचे बातम्या प्रकाशित होऊन सुद्धा महामंडळाच्या अभियंत्यांनी व अधिकाऱ्यांनी कुठलीच दखल घेतली नव्हती. इमारतीचे काम वाळू ऐवजी चक्क चुरी व डस्टने केलेले आहे तर पायाभरणीचे काँक्रीटचे बेड हे कुठलीही गजाळी न वापरता थातूरमातूर झाले असल्याचे व्हिडिओ देखील नागरिकांकडे व सोशल मीडियावर आहेत. आता या कामावर स्थगिती आणून झालेल्या कामाची चाचणी तपासणी करून निकष्ट दर्जाचे काम पाडण्याचे विभागीय अधिकाऱ्यांनी किंवा अभियंत्यांनी आदेश द्यावे जेणेकरून इमारती भविष्यात कोसळण्यापासून थांबेल खरोखरच आ. नवघरे हे बस स्थानकाची इमारती उत्कृष्ट दर्जाची करून घेतील का? व पोट गुत्तेदारापासून मुख्य गुत्तदारापर्यंत पाठपुरावा करतील का याकडे वसमतवासीयांचे लक्ष लागले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दौऱ्यानिमित्त भाजपची तयारी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ मे**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच हिंगोली जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत. त्यांचेहस्ते विविध विकास कामांचे भूमीपूजन, लोकार्पण तसेच कामांची पाहणी ते करणार आहेत. तसेच कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजनही करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर भाजपचयवतीने जय्यत तयारी करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दि २९ मे रोजी संभाव्य हिंगोली दौरा असून या दौऱ्यात त्यांचेहस्ते विविध विकास कामांचे भूमीपूजन, नवीन पंचायत समितीच्या इमारतीचे लोकार्पण तसेच भाजपचा कार्यकर्ता मेळावाही होणार आहे. या निमित्त भाजचे आ.तान्हाजीराव मुटकुळे यांनी दि २३ मे रोजी येथील रामलीला मैदानाची पाहणी केली. याठिकाणी भाजपचा कार्यकर्ता मेळावा होणार असून या मैदानाची पाहणी त्यांनी केली. यावेळी माजी शहराध्यक्ष कैलास काबरा, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, प्रा दुर्गादास साकळे, संजय कावडे, संतोष टेकाळे, नारायण खेडकर, रिपाईचे दिवाकर माने यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# वीर जवान संदीप गायकर यांना शासकीय इतमामात अखेरचा निरोप

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वाहिली श्रद्धांजली

शिर्डी, दि. २४ - जम्मू-काश्मीरमधील तिसवाड सेक्टर येथे सुरू असलेल्या सर्च ऑपरेशनदरम्यान दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत शहीद झालेले अकोले तालुक्यातील ब्राह्मणवाडा गावचे सुपुत्र संदीप पांडुरंग गायकर यांच्यावर त्यांच्या गावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. हजारो नागरिकांनी साश्रुनयनांनी त्यांना अखेरचा निरोप दिला. जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.



संदीप पांडुरंग गायकर (वय ३२) लष्कराच्या १५ मराठा लाईट इन्फंट्रीमधील १७ राष्ट्रीय रायफल्समध्ये सैनिक पदावर कार्यरत होते. तिसवाड सेक्टर येथे दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत गुरुवारी (दि. २२ मे) कर्तव्य बजावत असताना संदीप गायकर यांना वीरमरण आले. आज (दि. २४ मे) सकाळी त्यांचे पार्थिव ब्राह्मणवाडा येथे आणण्यात आले. लष्कर व स्थानिक प्रशासनाच्या उपस्थितीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार पार पडले.

भारतीय लष्कराच्या पथकांनी हवेत बंदुकीच्या फैरी झाडून त्यांना मानवंदना दिली. 'भारत माता की जय' व 'शहीद जवान संदीप गायकर अमर रहें' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. मुलगा रिहांस ह्याने त्यांच्या पार्थिवाला मुखाग्नि दिला. आमदार डॉ. किरण लहामटे, आमदार अमोल खताळ, माजी खासदार सदाशिवराव लोखंडे, माजी आमदार वैभव पिचड, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, तहसीलदार सिद्धार्थ मोरे, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्कॉड्रन लीडर विद्यासागर कोरडे, लष्कराच्या वतीने कर्नल केतन प्रसाद तसेच इतर मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करून शहीद संदीप गायकर यांना श्रद्धांजली वाहिली.

''संदीप गायकर यांनी देशासाठी दिलेले बलिदान आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. ब्राह्मणवाडा येथे त्यांचे स्मारक उभारण्यात येईल. त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात प्रशासन सहभागी असून कुटुंबीयांना शासन सर्वतोपरी मदत करेल,'' अशा शब्दांत पालकमंत्री श्री. विखे पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

जवान संदीप गायकर हे वयाच्या २० व्या वर्षी सैन्य दलात भरती झाले होते. त्यांनी गांधीनगर, जम्मू व काश्मीरमधील पुंछ सेक्टर, ५६ राष्ट्रीय रायफल्स, मध्य प्रदेशमधील घाना सागर व युनायटेड नेशन्स येथे सेवा बजावली होती. त्यांच्या पश्चात वडील, आई, पत्नी व मुलगा असा परिवार आहे.

# पारंपरिक कारागिरांच्या सक्षमीकरणासाठी 'प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना'ला जिल्ह्यात गती

## ७ हजार ६३२ कारागिरांना प्रशिक्षण ; ५०४ कारागिरांना बँक कर्ज वितरित

अहिल्यानगर, दि. २३ -* भारत सरकारच्या 'प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजने'ला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत ७ हजार ६३२ पारंपरिक कारागिरांना १५ प्रशिक्षण केंद्रांमार्फत प्रशिक्षण देण्यात आले आहे. यापैकी ५०४ कारागिरांना बँकांमार्फत कर्ज वितरित करण्यात आले असून उर्वरित लाभार्थ्यांच्या कर्ज प्रक्रियेस गती देण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी बालासाहेब मुंडे यांनी दिली.

ही योजना पारंपरिक कलेचा सन्मान राखत कारागिरांना आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य प्रदान करणारी आहे. देशाच्या सांस्कृतिक व औद्योगिक परंपरेला बळकटी देणाऱ्या या योजनेचा उद्देश पारंपरिक व्यवसायात गुंतलेल्या कारागिरांना व्यावसायिकदृष्ट्या सक्षम करणे हा आहे.

योजनेअंतर्गत पारंपरिक कौशल्य असलेल्या व्यक्तींना व्यवसायासाठी एकूण ३ लाख रुपयांपर्यंत कर्ज केवळ ५ टक्के व्याजदराने मिळू शकते. पहिल्या टप्प्यात १ लाख व दुसऱ्या टप्प्यात व्यवसाय विस्तारासाठी २ लाख रुपये मंजूर केले जातात. प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या लाभार्थ्यांना दररोज ५०० रुपये स्टायपेंड दिला जातो.

योजनेत सुतार, लोहार, मूर्तिकार, सोनार, नाभिक, धोबी, कुंभार, चर्मकार, विणकर, राजमिस्त्री, नाव बनवणारे, घंटा घडवणारे, तांब्या-पितळ काम करणारे, घड्याळ व दुरुस्ती करणारे, खेळणी बनवणारे, चाकू-कात्री धार करणारे, झाऱ्यांचे काम करणारे व झोळ्या-सुतपिशव्या तयार करणारे व्यवसाय समाविष्ट आहेत.

डिजिटल साक्षरता, ब्रँडिंग व विपणन प्रशिक्षण : योजनेत कारागिरांना उत्पादनांचे ब्रँडिंग, विपणन व डिजिटल व्यवहारासाठी प्रशिक्षण दिले जात आहे. सोशल मिडिया व ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उत्पादने विक्रीसाठी मार्गदर्शनही दिले जाते.

सुलभ ऑनलाइन अर्ज प्रक्रिया : योजनेसाठी अर्ज pmvishwakarma.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन करता येतो. Apply Online लिंकवर क्लिक करून नोंदणी केल्यानंतर नोंदणी क्रमांक व पासवर्ड डचड द्वारे प्राप्त होतो. त्यानंतर फॉर्म भरून आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावी लागतात.

पात्रता व आवश्यक कागदपत्रे : अर्जदार भारताचा नागरिक असावा, वय १८ ते ५० वर्षांदरम्यान असावे व १८ पारंपरिक व्यवसायांपैकी कोणत्याही एकाशी संबंधित असावा. अर्जासाठी आधार कार्ड, पॅन कार्ड, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, ओळखपत्र, रहिवासी दाखला, पासपोर्ट साइज छायाचित्र, बँक पासबुक व मोबाईल क्रमांक आवश्यक आहेत.

# पावसाळा लवकर सुरु झाल्याने शेतकरी चिंतेत

## अवकाळीने उडवली झोप,सोयगाव तालुक्यातील स्थिती

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ मे

मे महिना शेतकऱ्यांसाठी खरीप पूर्व मशागतीचा महिना म्हणून ओळखला जातो.मात्र यावर्षी संपूर्ण मे महिन्यात अवकाळी वातावरण असल्याने बळीराजाची झोप उडाली आहे. लवकर पावसाळा सुरू झाल्याने परिसरातील शेतकरी चिंतेत दिसत आहेत.आता खरीप पूर्व मशागत करावी तरी केव्हा असा प्रश्न सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना उपस्थित झाला आहे.

मे महिन्याच्या प्रारंभी लग्न समारंभउरकण्याकडे बळीराजाचा कल असतो.त्यानंतर मे महिन्याच्या मध्यापासून शेतकरी खरीप पूर्व मशागतीच्या कामात गुंतत असतो.विशेषतःया काळात नांगरणीची कामे केली जातात. मात्र,यावर्षी मे महिन्याच्या प्रारंभापासूनच अवकाळी पावसाने कायम बस्थान बांधले असल्याने आता बळीराजाची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.मृग नक्षत्र तोंडावर आले असताना आता खरीप पूर्व मशागतीची कामे करावी केव्हा असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे.

सोयगाव परिसरात गेल्या दहा दिवसांपासून अवकाळी पावसाची हजेरी आहे अवकळी पाऊस रोज हजेरी लावत आहे. यामुळे शेतीची कामे करावी कशी ? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. पावसाळ्यात मान्सूनचा पाऊस बरसणार का असा प्रश्न निर्माण झाला आहे.शेतकरी खरीपाची पेरणी करण्याची तयारी करत आहे.अवकाळी पावसामुळे कामांमध्ये अडथळा आलेला आहे.

# पैठण शहरातील पोलीस स्टेशन समोर साचले तळे

तभा वृत्तसेवा

पैठण दि २४ :- राज्यभरात अवकाळीचा जोर वाढला असता पैठणला ही बऱ्यापैकी पाऊस पडत आहे. मात्र शहरात सांडपाणी व्यवस्था तसेच स्वच्छता नसल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. पोलीस स्टेशन समोर सांडपाणी जाण्याची व्यवस्थाच नसल्याने याठिकाणी तळे साचल्याने दृश्य निर्माण झाले आहे. शहराची एकंदरीत परिस्थिती पाहता रविवारी समस्त पैठणकरांच्या वतीने व्यापक आंदोलना संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून पैठणला स्वच्छतेच्या प्रश्नी ग्रासले असतांना आता त्यात पावसाची



भर पडली आहे. परिणामी शहरात ठिकठिकाणी कचऱ्या जवळ पावसाचे पाणी साचल्याने त्याठिकाणी मोठी दुर्गंधी पसरली आहे.याबाबत नगर परिषदेने वेळीच पाऊल नाही उचलल्यास शहरात रोगराई पसरण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी नाले सफाई नसल्याने घाण पाणी नागरिकांच्या घरासमोर जमा झाले आहे तर काही ठिकाणी पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन लिकेज झाल्याने मोठी समस्या निर्माण झाली आहे. अश्या समस्त विविध समस्येप्रश्नी पैठणकरांच्या वतीने व्यापक आंदोलन बाबत रविवारी सायंकाळी ५ वाजता भवानी नगर येथील छत्रपती राजे संभाजी महाराज अभ्यासिका याठिकाणी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

# अमावस्या निमीत्त जटवाडा येथे होनार पंचामृत अभिषेक व महाप्रसाद

## अभिषेक णमोकार भक्ती मंडळचा सानिध्यात होनार

छत्रपती सभाजीनगर प्रतिनिधी - श्री.१००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे दिनांक २७ मे मगळवार २०२५ रोजी अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक श्री.संकटहर पार्श्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक णमोकार भक्ती मंडळचा सानिध्यात करण्यात येणार आहे. यावेळी सर्व उपस्थित समाज बांधवांना सकाळी ११ते २ या वेळेस अभिनंदन बाबूराव साखरे रेखा अभिनंदन साखरे बाहुबली नम्रता साखरे प्रिया खडके प्रिती वैभव गुलाखे सम्यक संस्कृती श्रियम साखरे जैन परीवार रामनगर छत्रपती सभाजीनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे

अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा आरती करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादी दाता परिवार व जटवाडा क्षेत्राचे विश्वस्थ मंडळ यांनी केले आहे

श्री.क्षेत्र जैनगिरी येथे महिन्याच्या प्रत्येक अमावस्येला भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येत असतो तसेच यावेळी महाप्रसादाचेही आयोजन केले जाते.

# सिल्लोड येथे शेतकरी महिला व शासन यांची तालुकास्तरीय संवाद कार्यशाळा

सिल्लोड : स्वयम् शिक्षण प्रयोग मार्फत दिनांक १६ मे २०२५ रोजी सिल्लोड या ठिकाणी महिलांच्या पुढाकारातून पर्यावरण पूरक शेती या प्रकल्प अंतर्गत शेतकरी महिला व शासन यांची तालुकास्तरीय संवाद कार्यशाळा संपन्न झाली.

शासन व शेतकरी यांच्यामध्ये संवाद होऊन, विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचावी या उद्देशाने संवाद कार्यशाळेचे आयोजन केले होते. यामध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणुन सिल्लोड तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी श्री दापके साहेब, तालुका कृषी विस्तार अधिकारी श्री बनसोडे साहेब, सांख्यिकी विस्तार अधिकारी के पाटील सर, एम एस आर एल एम विभागाचे श्री पवार सर, इ उपस्थीत होते.



स्वयम् शिक्षण प्रयोगचे प्रकल्प व्यवस्थापक मा. सम्राट कसबे यांनी संवाद कार्यशाळेचे यशस्वीरित्या आयोजन केले, तसेच स्वयम शिक्षण प्रयोग चे वैशाली घुगे अर्चना कोळी शुभम कुमावत व सिल्लोड तालुक्यातील ५० गावातील सखी व शेतकरी महिला यांची उपस्थिती होती.

कृषी अधिकारी श्री दापके यांनी संस्थेच्या या उपक्रमास उत्तम पर्याय म्हणुन संबोधिले. कारण पर्यावरण पूरक शेती ही महिलांच्या पुढाकारातून केली जाणार व यामुळे महिला शेतीमध्ये स्वतः निर्णय घेऊ शकतील आणि महिलांच्या निर्णय प्रक्रियेतील हे खूप महत्त्वाचे निर्णायक पाऊल असणार आहे ही खूप आनंदाची बाब आहे. यांनी स्वयम् शिक्षण प्रयोगच्या माध्यमातून आम्हाला असंख्य हात मिळत आहेत असे वक्तव्य केले.

माननीय पंचायत विस्तार अधिकारी गाडेकर सर यांनी सध्याच्या काळात महिला पुरुषासोबत खांद्याला खांदा लावून काम करत आहेत व महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत पंचायत समिती विभाग व संस्थेच्या मदतीने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत असे वक्तव्य केले.श्री. बनसोडे सरांनी चठएत्रड्ढ च्या योजनांची माहिती दिली व जलतारा योजना शेतकऱ्यांसाठी भविष्यात कशाप्रकारे फायदेशीर ठरू शकते हे सांगितले आणि जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आव्हान केले.

# एमजीएमच्या 'इंट्रूजन' चित्रपटाची इंटरनॅशनल सिल्व्हर स्क्रीन अवॉर्डसाठी निवड

छत्रपती संभाजीनगर, दि. २४ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फिल्म आर्ट्सचा अंतिम वर्षातील विद्यार्थी स्वप्नील सरोदे दिग्दर्शित 'इंट्रूजन' या पूर्ण लांबीच्या फीचर फिल्मची निवड इंटरनॅशनल सिल्व्हर स्क्रीन अवॉर्ड या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठी झाली आहे. हा पुरस्कार नवोदित आणि प्रयोगशील चित्रपट निर्मात्यांना व्यासपीठ देणारा जागतिक स्तरावरील मानाचा सन्मान मानला जातो.

इंट्रूजन ही फिल्म स्कूल ऑफ फिल्म आर्ट्सच्या अंतिम वर्ष अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून साकारण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना स्वतःची कथा लिहिण्याची, दिग्दर्शन करण्याची व निर्मितीची संधी देणारी ही भारतातील एकमेव संस्था आहे. त्यामुळे या यशाचे महत्त्व अधिकच वाढते. या उल्लेखनीय यशाबद्दल एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरु प्रा. डॉ. विलास सपकाळ आणि कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी स्कूल ऑफ फिल्म आर्ट्सचे प्रमुख प्रा.शिव कदम, दिग्दर्शक स्वप्नील सरोदे आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले.

गेल्या सात वर्षांत स्कूल ऑफ फिल्म आर्ट्सने शंभरहून अधिक कुशल तंत्रज्ञ, अभिनेता व अभिनेत्री घडवले आहेत. याच दरम्यान, या संस्थेने राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळवलेली अनेक पारितोषिकेही आपल्या नावावर केली आहेत.

इंट्रूजन या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारणाऱ्या निशांत पवार याचीही एका प्रमुख राष्ट्रीय टीव्ही मालिकेत मुख्य पात्रासाठी निवड झाली असून हे देखील स्कूल ऑफ फिल्म आर्ट्सच्या दर्जेदार आणि व्यवसायाभिमुख प्रशिक्षणाचे उत्तम उदाहरण आहे. भविष्यातील सर्जनशील, आशयघन व दर्जेदार सिनेमासाठी सक्षम व्यासपीठ निर्माण करण्याच्या आपल्या बांधिलकीला विद्यापीठाने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

# 'सीएसएमएसएस' ची सुवर्णकन्या संस्कृती शेळके राज्यातून पहिली



छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

शैक्षणिक गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देऊन आर्थिक सुदृढता आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा अधिक दर्जेदार करून विश्वासार्ह ओळख निर्माण करून देणाऱ्या छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था (सीएसएमएसएस) संचलित आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालयाची विद्यार्थिनी संस्कृती सतीश शेळके हिने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या हिवाळी-२०२३ विद्यापीठ परीक्षेत तृतीय वर्ष बीएएमएस परीक्षेत महाराष्ट्रातील १०७ महाविद्यालयांमधून प्रथम क्रमाक घेऊन सुवर्णपदक पटकावून राज्यातून प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

संस्कृती प्रथम वर्ष बीएएमएस उन्हाळी-२०२१ परीक्षेत महाराष्ट्रातून चौथा क्रमांक घेवून उत्तीर्ण झाली होती. गंगापूर येथील सतीश श्रीरंग शेळके यांची कन्या संस्कृती शेळके दहावीच्या परीक्षेत ९७ टक्के गुण घेवून शाळेत पहिली आली होती.

संस्कृती बीएएमएस तृतीय वर्षाच्या परीक्षेत १०५० पैकी ८३१ गुण मिळविले आहेत. वडील सतीश शेळके गंगापूर येथे संगणक दुरुस्तीचे काम करतात, तर आई शीला शेळके कपडे शिवण्याचे काम करतात. प्रतिकूल परिस्थितीत यश मिळविल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रणजित मुळे, सचिव पद्माकर मुळे, सदस्य तथा प्राचार्य डॉ. श्रीकांत देशमुख, उपप्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, जनसंपर्क अधिकारी संजय पाटील आदींनी तिचे अभिनंदन केले आहे.

# बिल भरणाऱ्या शेतकऱ्यांचा महावितरणतर्फे सत्कार

छत्रपती संभाजीनगर : राज्य शासनाने जुलै-२०२४ मधे सुरू केलेल्या मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेत समावेश नसलेल्या परिमंडलातील ७.५ अश्वशक्तीवरील (एचपी) क्षमता असलेल्या १३३ कृषिपंपधारक शेतकऱ्यांनी ४६ लाख रुपयांचे वीजबिल भरले आहे. महावितरणच्या हाकेला साद देत थकीत वीजबिलांचा भरणा केल्याबद्दल या शेतकऱ्यांचा महावितरणच्या वतीने सत्कार करण्यात आला.महावितरणच्या साडेसात अश्वशक्तीपर्यंत क्षमता असलेले ३ लाख ६८ हजार ६२२ कृषिपंप वीजग्राहक असून मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेअंतर्गत चालू त्रैमासिक वीजबिले माफ करण्यात येत आहेत.

# रामराव जाधव यांचे निधन



तभा वृत्तसेवा

कन्नड -दि.२४ मे- पिशोर येथील रहिवासी तथा निवृत्त शिक्षक रामराव तुळशीराम जाधव (वय ७६) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी रात्री ११.४५ वाजे दरम्यान निधन झाले. शनिवारी दुपारी कन्नड येथील देवलोक स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते शिवाजी महाविद्यालय कन्नड येथील लिपिक आनंद जाधव यांचे वडील,तर ग्रामविकास अधिकारी माणिक पगारे यांचे सासरे जिल्हा बँकेचे शाखाधिकारी प्रमोद जाधव, कृषी विस्तार अधिकारी शिरीष जाधव, पोलीस उपनिरीक्षक सुमेध जाधव यांचे काका होत.

# युद्धात भारताच्या विजयप्राप्तीसह सैनिक आणि धर्मकार्य करणारे यांच्या रक्षणार्थ शतचंडी याग पार पडला !

## सनातन संस्थेच्या आश्रमात श्री ललिता त्रिशती पूजन !

फोंडा, (गोवा) - भारताच्या विजयासाठी, तसेच सैनिकांसह देश-विदेशातील साधक आणि समस्त धर्मप्रेमी यांच्या रक्षणासाठी 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'च्या निमित्ताने गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर ३५ पुरोहितांद्वारे शतचंडी याग पार पडला. शतचंडी याग चांगल्या प्रकारे पूर्ण झाल्याविषयी आणि सनातन संस्थेचे कार्य उत्तरोत्तर वाढत रहावे, यांसाठी रामनाथी, गोवा येथील सनातन संस्थेच्या आश्रमात 'श्री ललिता त्रिशती देवी'ची पूजा भावपूर्ण वातावरणात करण्यात आली. या पूजेत तमिळनाडू येथील श्री. गुरुमूर्ती शिवाचार्य, श्री. अरुणकुमार गुरुमूर्ती यांनी त्रिपुरासुंदरी त्रिशती देवीची नावे उच्चारत पुष्पार्चना केली.



सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ आणि सद्गुरु नीलेश सिंगबाळ, तसेच श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ अन् सद्गुरु डॉ. मुकुल गाडगीळ यांनी पूजेचे यजमानपद भूषवले. या वेळी सनातनचे उपस्थित संत आणि साधक यांनी पूजेच्या संकल्पपूर्तीसाठी श्री ललितादेवीच्या चरणी मनोभावे प्रार्थना केली.

शतचंडी यागात आद्यहोम, सप्तशती पारायण, कन्यापूजन, सुवासिनी पूजन, ब्रह्मचारी पूजन, दांपत्य पूजन, गोपूजन या धार्मिक विधीनंतर पूर्णाहुती आदी धार्मिक विधी झाले. १०० पाठांचा जप आणि १० पाठांचे हवन करण्यात आले. श्री ललिता त्रिशती देवीची पूजा ललितादेवीची कृपा आणि आशीर्वाद मिळण्यासाठी केली जाते. या पुजेतून सैनिक, साधक आणि धर्मप्रेमी यांच्या शरीरासह, मन, बुद्धी आणि सूक्ष्म देह यांभोवती संरक्षण कवच निर्माण व्हावे, यासाठी आदिशक्तीच्या चरणी प्रार्थना करण्यात आली.

# शांती नर्सिंग होम येथे 'स्किझोफ्रेनिया डे' साजरा

छत्रपती संभाजीनगर, दि. २४ मे : कांचनवाडी, पैठण रोडवरील शांती नर्सिंग होम येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही 'जागतिक स्किझोफ्रेनिया सप्ताह' साजरा करण्यात आला. या सप्ताहात रुग्ण व नातेवाईकांकरीता आठवडाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स्किझोफ्रेनियाग्रस्त रुग्णाच्या वैद्यकीय उपचारानंतरही आजाराची काही लक्षणे जसे की, बौद्धीक क्षमता पूर्ववत न होणे, एकाग्रता कमी होणे, भावनांचा बोथटपणा, कमी होत नाहीत. रुग्णाचे आयुष्य पूर्व पदावर आणण्याकरिता स्किझोफ्रेनियाग्रस्त रुग्णांचे पुनर्वसन करणे अत्यंत आवश्यक असते. शांती नर्सिंग होम येथे हे काम अनेक वर्षांपासून मोफत केले जात आहे.

स्किझोफ्रेनिया दिनानिमित्त पुनर्वसन विभागातर्फे स्किझोफ्रेनिया आजार व उपचार तसेच पुनर्वसन या बद्दल जनजागृती करण्याकरिता शांती नर्सिंग होम येथील मनोविकार तज्ञांनी पुनर्वसनामुळे ज्यांचे आयुष्य सुरळीत झाले अशा रुग्णांच्या सक्सेस स्टोरीज् रेडियोवर सांगितल्या. त्याचबरोबर रुग्णांकरिता आठवडाभर ऑनलाइन ॲक्टीव्हिटीज् जसे की, चित्रकला, हस्तकला, पाककला, वृक्षारोपण, ब्रेन गेम्स इ. घेण्यात आल्या. 'स्किझोफ्रेनिया डे'च्या निमित्त रुग्ण, नातेवाईक व डॉक्टर्स यांची क्रिकेट मॅच आयोजित करण्यात आली. त्यात ४०च्या वर रुग्णांनी सक्रिय सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे आयोजन शांती नर्सिंग होम येथील पुनर्वसन विभागाच्या समुपदेशक शितल सूर्यवंशी, प्रार्थना कुलकर्णी यांनी डॉ. विनय बाऱ्हाळे व डॉ. विनायक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केले. कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता रोहित सपकाळ, योगिता बावीस्कर, कुंदन शिंदे, सचिन आव्हाड, गणेश डोमाळे, रवींद्र शिंदे यांनी अथक परिश्रम घेतले.

## अग्रलेख...

# सुगीची हंगामगाथा!

मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्याची सुरुवात झाली की मनाला नकळत एक अस्वस्थता जाणवू लागते. हा अनुभव प्रत्येकास येत असला, तरी त्या अस्वस्थतेचीही गेल्या काही दशकांत एवढी सवय झालेली असते की मानसिक अवस्थेतील या संथ बदलाची फारशी जाणीवपूर्वक दखलही घेतली जात नाही. उन्हाच्या काहिलीने हैराण झाल्यावर थंड वाऱ्याची एखादी झुळूक मनाला आणि शरीराला समाधानाचा अनुभव जेव्हा देते, तेव्हा अस्वस्थतेची ती जाणीव जागी होते. मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्याच्या सुरुवातीलाच अशी एक दिलासादायक झुळूक मनाला सुखावून देणारी ठरली आहे. खरे म्हणजे, वर्षाकाठी येणाऱ्या प्रत्येक ऋतूने विक्रमाचा नवा उच्चांक करण्याचा जणू ध्यासच घेतला असावा असा अतिरेक सुरू केल्यापासून, ऋतुमानासोबत येणाऱ्या दिलाशाच्या आणि समाधानाच्या पातळीत काहीसा बदलही होऊ लागला आहेच आणि नव्याने दाखल होणाऱ्या ऋतूच्या अनुभवाचा आनंद घेण्याची मानसिक तयारी होत असताना, नव्या ऋतूत सारे काही ठाकठीक असेल ना, या शंकेचे सावटही मनामनावर दाटू लागले आहे. यंदाच्या भाजून काढणाऱ्या उन्हाळ्यापाठोपाठ येऊ घातलेल्या पावसाळ्याची रूपे कशी असतील, याची काळजी उमटू लागलेली असतानाच, मावळत्या उन्हाळ्याला निरोप देण्यासाठीच जणू आकाशात ढगांची रांगोळी उमटू लागली असून, उन्हाळ्याच्या हंगामाची अखेर पावसाच्या सरींनी होणार अशी चिन्हे दिसू लागल्याने, समाधानाच्या त्या संथ जाणिवादेखील जिवंत होऊ लागल्या आहेत आणि त्यातच नव्या हंगामाची सुचिन्हे स्पष्ट झाल्याने मौसमी पावसाच्या आगमनासोबत सुगीचे दिवसही सुरू होणार अशा सुवार्ताही येऊ लागल्या. राज्य सरकारने त्यावर शिक्कामोर्तबही केले आणि नवा सुगीचा हंगाम महाराष्ट्रासाठी पीकपाण्याची बरकत घेऊनच येणार असल्याची आनंदवार्ता सरकारनेच जाहीर केली. मावळत्या उन्हाळ्याच्या काहिलीवरील हा शीतल शिडकावा नव्या सुगीच्या हंगामाला आनंदाची झालर लावणारा ठरणार आहे.

गेल्या काही दशकांपासून हवामान बदलाच्या विचित्र बातम्यांनी जग धास्तावून गेले आहे. प्रत्येक ऋतूमध्ये हवामानाच्या अतिरेकी उच्चांकामुळे जीवसृष्टीच्या अस्तित्वावर नैसर्गिक आपत्तींचे सातत्यपूर्ण सावट दाटून राहिले आहे. जागतिक भाषेत ज्याला क्लायमेट चेंज असे म्हणतात, तो वातावरणातील बदल आता आपल्या अगदी उंबरठ्याशी येऊन ठेपला असून, तो जीवघेणा ठरू पाहात आहे. निसर्गाचे स्वतःचे काही नियम असतात. त्याचा ऋतुकाळ ठरलेला असतो. म्हणजे, त्या त्या ऋतूच्या काळातच हवामानातील अपेक्षित बदल घडत असतात. अलिकडे मानवनिर्मित कारणांमुळे त्याची तीव्रता कमीअधिक होत असते, पण तो दोष निसर्गाचा नसल्याने अशा वेळी निसर्ग सहसा तटस्थ राहात असतो. त्यामुळे, उन्हाळा हा नेमेचि येणाऱ्या पावसाळा, हिवाळ्यासारखाच एक नैमित्तिक हंगाम असूनही, त्याच्या चटक्यांची तीव्रता वाढताना निसर्ग त्यामध्ये ढवळाढवळ करत नाही. हवामानबदलाची जी चर्चा अलिकडे जगभर ऐकावयास येत असते, त्यास निसर्ग कारणीभूत नसून मानवाच्या अनिर्बंध वर्तणुकीचाच मोठा वाटा आहे, हे आता सिद्ध झालेले असल्याने, हवामान बदलाचे जे फटके माणसासह अन्य सजीवांना भोगावयास लागत आहेत, ते निसर्ग तटस्थपणे पाहात असतो. म्हणूनच सध्या उन्हाळ्याचे जीवघेणे फटके सोसावे लागत असताना, निसर्गास दोष देण्याची माणसाची हिंमत राहिलेली नाही. हा दोष आपलाच आहे आणि जे काही भोगावे लागत आहे त्यास आपणच कारणीभूत व जबाबदार आहोत याची जाणीव असल्याने परिणामांना सामोरे जाण्याखेरीज अन्य पर्याय राहिलेला नाही. म्हणूनच, जेव्हा आपल्याच एखाद्या कृतीने कोणतेही वातावरण तापते, हवामानात अचानक बदल होऊन सारे काही सैरभैर होऊ लागते, उपाय योजण्याच्या उद्देशाने करावयाच्या कृतीदेखील अंगाशी येण्याची भीती वाढू लागते, तेव्हा त्याचे थेट आणि अप्रत्यक्ष परिणाम सर्वसामान्यांस किंवा ज्यांचा त्या कृतीशी दुरूनही संबंध नाही अशांनाही भोगावेच लागतात. अनेकदा तर अशा तापलेल्या वातावरणामुळे निष्पापांची आखीव जीवनशैलीही नको असताना विस्कटून जाते आणि बाहेर काय घडणार या चिंतेचे सावट मनामनावर पसरते. सध्याच्या उन्हाळ्यात हेच दिसून आले. अशा तापलेल्या हवामानात घराबाहेर पडणेदेखील कठीण होऊन जाते. हवेत विहरणारे पक्षीदेखील, उन्हाच्या तप्त झळांनी घायाळ होऊन अचानक जमिनीवर कोसळतात आणि अखेरचा श्वास घेतात. माणसांची अवस्थाही बिकट होते. अनपेक्षितपणे बदललेल्या अशा हवामानात आपण नेमके कसे वागले पाहिजे हेच समजेनासे होते आणि अवघा समाज भेदरल्यागत होऊन जातो. या झळा कोणत्या कारणामुळे एवढ्या तीव्र झाल्या हेच समजेनासे होऊन संभ्रमावस्था वाढते आणि मन ताळ्यावर राहात नाही.

निसर्गतः निर्माण होणाऱ्या उन्हाळ्याच्या काहिलीस आरोग्य विभागाने हळुवार येणारी आपत्ती (सायलेंट डिझास्टर) असे नाव दिले आहे. म्हणूनच, आता पुरे झाल्या झळा, अशी मनाची अवस्था होते आणि दुखऱ्या जखमेवर एखादी हळुवार फुंकर बसावी आणि मनाला दिलासा मिळावा असे काही घडले की आश्वस्त भावना जागी होऊन आसपासच्या उन्हाळ्याच्या आणि समस्यांच्याही झळा सुसह्य वाटू लागतात. गेल्या बुधवारी अशीच एक हळुवार फुंकर राज्य सरकारच्या बैठकीनंतर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पसरली. यंदाचा पावसाळा सुसह्य तर आहेच, पण राज्यातील काळ्या आईला तृप्त करून सोडणारा व पीकपाण्याच्या दृष्टीने बळीराजाला सुगीचे व सुखाचे दिवस दाखविणारा असेल, असा दिलासा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राला दिला आहे. हवामान खात्याच्या सध्याच्या अंदाजानुसार, राज्यात सर्वत्र सरासरीहूनही अधिक पाऊस पडणार असल्याने अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन होईल असा अंदाज कृषी विभागाने वर्तविला आहे. या हंगामात १४५ लाख हेक्टरवर पेरणीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, एवढ्या क्षेत्रावरील पेरण्यांसाठी आवश्यक असलेल्या दर्जेदार बियाणांच्या पुरवठ्याची हमीदेखील सरकारने शेतकऱ्यांस दिली आहे. राज्यात यंदाच्या हंगामात १९.१५ लाख क्विंटल बियाणांची गरज असेल, तर राज्याकडे २५ लाख क्विंटलहून अधिक बियाणांचा साठा उपलब्ध असल्याने बियाणांच्या टंचाईचा शेतकऱ्यांस नेहमी छळणारा प्रश्न सरकारने निकाली काढला आहे. यामुळे यंदाच्या खरीप हंगामात २०४ लाख टन अन्नधान्य महाराष्ट्रात पिकेल, असा अंदाज आहे. केवळ पाऊस चांगला पडला म्हणजे सारे काही छान होते, हा समज आता जुना झाला. गेल्या काही हंगामांतही काळी आई शेतकऱ्यांच्या पदरात त्यांच्या घामाचा पुरेपूर मोबदला टाकण्यासाठी सज्ज झाली होती. पण खराब दर्जाचे बियाणे, खतांची टंचाई, काळाबाजार अशा अनेक समस्यांनी शेतकऱ्यांच्या अपेक्षांवरच पाणी फेरले. अनेक संकटांशी संघर्ष करत शेती हा व्यवसाय आव्हान म्हणून पेलणाऱ्या बळीराजाची उमेद अशा संकटांत खच्ची होत असते. राज्य सरकारने यंदा मात्र या संकटांचा सामना करण्यासाठी शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून सज्ज राहण्याची तयारी चालविली आहे. राज्याला खरीप हंगामात ४५ लाख टन रासायनिक खतांची गरज असते. यंदा केंद्र सरकारनेच सुमारे ४७ लाख टन खतांचा साठा महाराष्ट्रासाठी मंजूर केला आहे, त्यामुळे आता गरजेच्या वेळी तो शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याचे आव्हान राज्य सरकारला पेलावे लागेल. गेल्या चारपाच महिन्यांत नैसर्गिक आपत्तींमुळे राज्याच्या विविध भागांत जवळपास ५५ हजार हेक्टर शेतमिनीचे क्षेत्र बाधित झाले. याच कालावधीत संकटांचा सामना करताना अनेक शेतकऱ्यांनी हिंमत सोडली आणि जवळपास एक हजार शेतकऱ्यांनी आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले. विधिमंडळातील विरोधी पक्षांनी याच मुद्याकडे सरकारचे लक्ष वेधले असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याकरिता सरकारला साद घातली आहे. यंदाच्या पावसाळ्यातील सुगीच्या हंगामावर अशा संकटांचे सावट राहू नये यासाठी सरकारने खबरदारीच्या उपाययोजना आखल्या आहेत. नव्या सुगीच्या हंगामाची ही आनंदगाथा बळीराजास आणि संपूर्ण राज्यालाच सुखावणारी ठरेल, अशी चिन्हे सध्या तरी दिसू लागली आहेत.

---

## प्रासंगिक

**- वेद कुमार**

# वेल-डन महाराष्ट्र

**महाराष्ट्रात एकूण २६६८६ स्टार्टअप्स कार्यरत असून ही संख्या देशातील एकूण स्टार्टअप्सच्या २४ टक्के आहे. महाराष्ट्र भारताचे स्टार्टअप्स-कॅपिटल आहे.**

स्टार्टअप्सच्या माध्यमातून देशातील तरुण उद्योजक भारताच्या आर्थिक स्वावलंबनाचे स्वप्न साकार करत आहेत. स्टार्ट-अप्स च्या माध्यमातून मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत या संकल्पनांना बळकटी देण्यात महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे. राज्य सरकारने 'महाराष्ट्र स्टार्टअप वीक', 'मुंबई फिनटेक हब', 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना' यांसारखे महत्त्वाचे उपक्रम राबवले आहेत. या उपक्रमांमुळे राज्यातील नवउद्योजकांना आर्थिक सहाय्य, मार्गदर्शन आणि विकासाच्या संधी मिळाल्या आहेत.

केवळ मुंबईतील स्टार्टअप्सनी यावर्षी एकूण ३.७ अब्ज निधी उभारला आहे, ज्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत १५४ टक्के वाढ झाली आहे. हे यश राज्य सरकारच्या प्रोत्साहनपर धोरणांमुळेच शक्य झाले आहे. पुणे हे माहिती तंत्रज्ञान, ऑटोमोटिव्ह आणि जैवतंत्रज्ञान या क्षेत्रांतील स्टार्ट-अप्स मध्ये देशात एक नंबर वर आहे. नवी मुंबईत ३०० एकर क्षेत्रावर विकसित होणारी अत्याधुनिक 'इनोव्हेशन सिटी' ही राज्य सरकारच्या स्टार्टअप्स विषयी असलेल्या महत्त्वाकांक्षी दृष्टिकोनातून निर्माण होत आहे.

स्टार्टअप इकोसिस्टिम देशासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे कारण ते रोजगार निर्मिती करते, आर्थिक प्रगतीला चालना देते, नवसंकल्पना साकारण्यास मदत करते आणि भारताला जागतिक स्तरावर एक बलाढ्य राष्ट्र म्हणून सिद्ध करते. भारतामध्ये ११९ युनिकॉर्न स्टार्टअप्स आहेत. युनिकॉर्न म्हणजे असे स्टार्टअप ज्यांचे व्हॅल्यूएशन १ अब्ज पेक्षा अधिक आहे. हे युनिकॉर्न्स फिनटेक, ई-कॉमर्स, लॉजिस्टिक्स आणि एंटरप्राइज टेक्नॉलॉजी यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. यापैकी तब्बल २७ युनिकॉर्न्स एकट्या महाराष्ट्रात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यशस्वी नेतृत्वात महाराष्ट्राची या क्षेत्रात सुरू असलेली ही अभूतपूर्व घोडदौड संपूर्ण देशाच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त करत आहे आणि भविष्यातील एक सामर्थ्यवान, उर्जावान भारताची पायाभरणी करत आहे. भविष्यातील अंबानी, अदानी, मूर्ती, महिंद्र, प्रेमजी, मित्तल, जिंदाल इकडूनच येणार आहेत. त्या सर्वांना माझ्या भरभरून शुभेच्छा.

**जय हिंद, जय महाराष्ट्र.**



---

## वेध

**हेमंत सालोडकर**

# भारत होणार क्रीडा-पंढरी

भारतात सध्या क्रीडा स्पर्धांचा ज्वर आहे. ग्रामीण भागात आणि शहरात कोणती तरी स्पर्धा सुरूच आहे. या स्पर्धांतून तळागाळातील खेळाडूंचे सुप्त गुण उजागर होतात आणि त्या गावाचा आणि शहराचा नावलौकिक होतो. याच खेळाडूंमधून पुढे आलेले निवडक खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव मोठे करतात. आता तर केंद्र सरकारही खेळाडूंना प्रत्येक प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे खेळाडूंचा आत्मविश्वास दुणावला आहे आणि तेही निरनिराळ्या स्पर्धांमध्ये भाग घेत आहेत. सोबत नागरिकांचाही खेळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. पहिले केवळ शैक्षणिक पात्रतेवरून मुलांच्या हुशारीचा कस लागायचा. नोकरीतही शैक्षणिक पात्रता किती आहे, हे तपासले जात होते. पण काळ बदलला. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडाला महत्त्व आले. त्यातून खेळाडूचा आणि त्याच्या कुटुंबाचा आर्थिक विकास होत गेल्याने क्रीडा क्षेत्राकडे पाहण्याचा सर्वांचा दृष्टिकोन बदलला. आता शिक्षणासोबतच इतरही उपक्रमांत विद्यार्थी किती जागरूक आहे, तो कोणता खेळ खेळतो, त्याच्यावर परीक्षेत गुण मिळत असल्यामुळे विद्यार्थ्यांचा ओढा खेळाकडे वाढला आहे. अशा विद्यार्थ्यांच्या गुणांना हेरून त्यांना ग्रामीण भागात विविध स्पर्धांमध्ये भाग घ्यायला लावून, विविध प्रकारची आकर्षक बक्षिसे देऊन त्यांच्यात खेळाबाबत रुची निर्माण करण्यात येत आहे. जेणेकरून हे विद्यार्थी ग्रामीण भागातून निघून थेट ऑलिम्पिकपर्यंतच्या स्पर्धांमध्ये भाग घेऊ शकतील. त्या प्रकारची त्यांची मानसिकता, शिक्षण, खेळाकडे पाहण्याचा त्यांचा, त्यांच्या घरच्यांचा दृष्टिकोन बदलण्याचा प्रयत्न होत आहे. याचाच भाग म्हणून आता ग्रामीण भागात स्वदेशी खेळासोबत आंतरराष्ट्रीय स्पर्धाही होत आहेत. त्याच स्पर्धा भव्य प्रमाणात शहरात होत असल्याने ग्रामीण भागातील खेळाडू, अगदी आदिवासी भागातील मुलेही त्यात भाग घेत आहेत आणि बक्षिसांची लयलूट करून स्वतःचा आणि ते राहतात त्या भागाच्या विकासात महत्त्वाचे योगदान देत आहेत.

अशा मुलांना किंवा मुलींना हेरून त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेण्यास प्रोत्साहन देण्यात येत आहे. काही मुले कौशल्य असूनही घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे मोठ्या स्पर्धांमध्ये भाग घेऊ शकत नाहीत आणि त्यांचे कौशल्य त्यांच्यासोबत दबून जाते. अशी कितीतरी मुले-मुली मागे राहिले आणि त्यामुळे देशाच्या क्रीडा विकासाला खीळ बसली. २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताने १ रौप्य आणि ५ कांस्य अशी एकूण सहा पदके मिळवली. नेमबाज मनू भाकरने ऑलिम्पिकच्या एकाच हंगामात दोन पदके जिंकून पहिली भारतीय बनून इतिहास घडवला. असे कितीतरी हिरे देशाच्या प्रत्येक शहरात आहेत. त्यांच्या गुणांना पैलू पाडून त्यांचा आणि देशाचा विकास करता येऊ शकतो. पण आता अशा मुलांसाठी सरकारसह काही संस्था-संघटनाही पुढे येऊन मदत करीत आहेत. देशाची ऑलिम्पिक पदकांची संख्या वाढविण्यासाठी, क्रीडा मंत्रालयाने कॉर्पोरेट जगत आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांना खेळांशी जोडण्यासाठी पुढाकार घेतला आहे. याअंतर्गत मंत्रालयाने देशातील आघाडीची कॉर्पोरेट घराणी आणि सार्वजनिक उपक्रमांसोबत एक आभासी बैठक घेतली. या बैठकीत बीसीसीआयसह ५० हून अधिक संस्थांनी भाग घेतला. बैठकीत क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी नॅशनल फर्टिलायझर्स लिमिटेड, कोल इंडिया आणि बीसीसीआयसह इतर प्रतिनिधींना खेळाडूंच्या प्रशिक्षण, पोषण आणि प्रशिक्षणाची जबाबदारी घेण्याची विनंती केली आणि मंत्राच्या विनंतीला सर्व कंपन्यांनी तत्वतः सहकार्य करण्यास सहमती दर्शविली आहे. बीसीसीआयने तर तीन खेळ स्वीकारण्याची इच्छा व्यक्त केली. क्रीडा मंत्रालयाने सर्वांना या संदर्भात ठोस योजना मागितली आहे. प्रस्तावित योजनेनुसार, कंपन्या निवडलेल्या खेळांसाठी प्रशिक्षण, पोषण आणि प्रशिक्षणाची व्यवस्था करतील. या प्रक्रियेवर देखरेख करण्यासाठी मंत्रालय आणि संबंधित राष्ट्रीय क्रीडा महासंघांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली एक देखरेख समितीदेखील असेल. या संघटनांनी आर्थिक मदत केली तरी सरकारही आपल्या वतीने मदत करणारच आहे. सरकारी निधी सुरूच राहणार आहे. काही ठिकाणी या संस्थांमार्फत शिबिरेही होणार आहेत. यातून लॉस एंजेलिस येथे होणाऱ्या ऑलिम्पिकची तयारी चांगल्या प्रकारे करता येईल. त्यासाठी आतापासूनच राष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात स्पर्धा सुरू आहेत. येत्या काही वर्षांत भारतात विदेशातील खेळाडू प्रशिक्षणासाठी येतील. म्हणजे भारत भविष्यात क्रीडा-पंढरी म्हणून उदयास येईल, हे नक्की.

९८५०७५३२८१

---

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# चोराच्या उलट्या बोंबा?

अखंड शिवसेनेतील तीनचर्तुथांश सदस्य जेव्हा उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाला लाथ मारून निघून जातात, तेव्हा त्या लोकांना गद्दार आणि भ्रष्टाचारी असल्याचे उबाठा गटाकडून सांगितले जाते. हेच ते लोक होते जे उद्धव ठाकरेंच्या कॅबिनेटमध्ये होते. आता महायुतीत आहेत. त्यामुळे हे सगळे ठाकरेंचे शिलेदार जर चोर, उचक्के असतील तर ते तिकडेही होते आणि आता इकडेही आहेत असेच उबाठा गटाच्या वक्तव्यातून उद्धृत होते. त्यामुळे राज्यातील आजच्या या राजकीय परिस्थितीकडे बघितल्यास राहत इंदोरी यांचा हा शेर आठवल्याशिवाय राहत नाही.

**"बन के इक हादसा बाज़ार में आ जाएगा**
**जो नहीं होगा वो अखबार में आ जाएगा...**
**चोर उचक्कों की करो कद्र, क्या मालूम**
**कौन, कब, कौन सी सरकार में आ जाएगा..."**

शिवसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे यांच्या सोबत गेलेले सर्व नेते हे उद्धव ठाकरेंसोबत काम करत होते. बरं एक दोन वर्षांपासून काम करत आहेत अशातला भाग नाही. तर, बाळसाहेबांसोबत ३०-४० वर्षांपासून काम करत असलेले हे सगळे नेते आहेत. ज्यांनी आपले रक्त सांडवून, घाम गाळून शिवसेना उभी केली. हां त्यांची चूक एवढीच झाली की त्यांनी उद्धव ठाकरेंच्या हिटलरशाहीविरोधात आवाज उठवून त्यांच्या विरोधात उठाव केला आणि ठाकरेंना अस्मान दाखवले. अशा या सगळ्याच व्यक्ती उद्धव ठाकरेंना सोडल्याबरोबर एका रात्रीतून भ्रष्टाचारी झाल्या. मुळात भाजपात आल्याआल्या ते भ्रष्टाचारी झाले असे उबाठा गटाला किंवा उबाठाचे प्रवक्ते संजय राऊतांना म्हणायचे असेल तर, यापेक्षा बाळबोध गोष्ट दुसरी कोणती असू शकत नाही.

धुळ्याच्या विश्रामगृहात कोट्यवधी रुपये सापडले. हे अर्जुन खोतकरांचे भ्रष्टाचारातून कमावलेले असल्याचा आरोप संजय राऊत करीत आहेत. राऊत केवळ आरोप करून मोकळे झालेले नाहीत तर, खोतकरांचा पूर्वेतिहासच भ्रष्टाचाराचा असल्याचे ते म्हणत आहेत. यावरून एक गोष्ट तर राऊतांनी जाहीरपणे कबूल केली की, त्यांच्या पक्षातले अधिकाधिक लोक भ्रष्ट आहेत आणि त्यांचा पूर्वेतिहासच भ्रष्टाचाराचा आहे. फक्त पक्षात असले तर, त्यांना आम्ही पाठीशी घालतो आणि सोडून गेला की दुसऱ्याच सेकंदाला त्याला भ्रष्ट जाहीर करतो. बरं यावेळी खोतकरांवर भ्रष्टाचाराचे आरोप करणारे राऊत तर, स्वतः पत्राचाळ घोटाळ्यातले १०० दिवसांचा तुरुंगवास भोगून, सध्या जामिनावर बाहेर असलेले एक आरोपी आहेत.



राऊतांच्या पत्नीने बँक घोटाळ्यातील आरोपीच्या पत्नीकडून ८० लाख रुपये घेतले. हा देखील त्यांच्या पत्नीद्वारे केलेला एक भ्रष्टाचारच आहेत. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांच्या नेतृत्वात गृहमंत्री १०० कोटी रुपयाची खंडणी गोळा करतो, ठाकरेंचा प्रवक्ता पोलिस दलात रुजू होऊन ही खंडणी गोळा करण्यास मदत करतो, खंडणी प्रकरण उजागर होऊ नये म्हणून एका सामान्य माणसाची निर्घृण हत्या करतो, त्याला पाठीशी घालण्याचं काम ठाकरे करतात... असे लोक आता दुसऱ्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आघाडीवर दिसत आहेत. मुळात संजय राऊतसारख्या जामिनावर असलेल्या गुन्हेगाराने एखाद्याचं नैतिक मूल्यमापन करणं हास्यास्पदच म्हणावं लागेल. शिवाय एका आर्थिक फसवणूक आणि लबाडी प्रकरणात गुन्हेगार असलेल्याने दुसऱ्याला भ्रष्ट संबोधणे म्हणजे, याला चोराच्या उलट्या बोंबाच म्हणावं लागेल.

**फडणवीसांच्या विकासपर्वात खोडा**

महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर मंत्रिमंडळ विस्तार बराच काळ लांबला होता. त्याचं मुख्य कारण मंत्रिमंडळात स्वच्छ व पारदर्शक अशी छवी असलेल्यांची निवड करणे हे होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची यावेळी मोठी तारेवरची कसरत झाली होती. गाळणी लावून छाननी करण्याचा पुरेपूर प्रयत्न झाला. येथे पुरेपूर प्रयत्न म्हणण्याचं कारण म्हणजे, भाजपाचे केंद्रीय स्तरावरील शीर्ष नेतृत्व आणि राज्यातील शीर्ष नेतृत्वाने आपल्या पूर्ण शक्तिनिशी स्वच्छ प्रतिमेचे चेहरे मंत्रिमंडळात असावे यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, तरीदेखील मित्रपक्षांतील काही चेहऱ्यांमुळे या प्रयत्नात पूर्ण यश भाजपाला, देवेंद्र फडणवीसांना आलेले नाही. कारण नुकतेच घडलेले शिवसेनेचे नेते अर्जुन खोतकरांच कोट्यवधींचे रोकड प्रकरण, मागील धनंजय मुंडे प्रकरण, छगन भुजबळ प्रकरण, हसन मुश्रीफ भ्रष्टाचार प्रकरण, या सगळ्या प्रकरणांमुळे हे सिद्ध होते. त्यात अजून मृद आणि जलसंधारण विभागात पैसे घेऊन नियुक्त्या केल्याचा आरोप आधीच डागाळलेले मंत्री संजय राठोड यांच्यावर लागला आहे. या अशा लोकांमुळे स्वच्छ प्रतिमेच्या आग्रहाला थोडा ब्रेक लागला असे म्हणता येईल. मुळात देवेंद्र फडणवीस तब्बल ५ वर्षे राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री राहिले. आता ते पुन्हा सहा महिन्यांपासून मुख्यमंत्री आणि गृहमंत्री आहेत. पण त्यांच्या पांढऱ्या शर्टावर एक शिंतोडासुद्धा उडाला नाही. किंबहुना जोरजबरदस्ती विरोधकांकडून उडविण्याचा एकदोन वेळा प्रयत्न झाला. मात्र, फडणवीसांच्या पारदर्शक छवीमुळे तो यशस्वी होऊ शकला नाही.

भ्रष्टाचारावर झीरो टॉलरेन्स नीती असलेले, स्वच्छ आणि पारदर्शक काम करण्याचा शंभर टक्के प्रयत्न करणारे देवेंद्र फडणवीस मात्र या अशा प्रकरणांमुळे वेळोवेळी अडचणीत येताना दिसत आहेत. आणि बहुतांश वेळा मित्रपक्षांच्या नेत्यांनीच त्यांना अडचणीत आणल्याचे अनेक उदाहरणांवरून दिसते. महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी स्थगिती सम्राट बनून राज्याच्या विकासाला ब्रेक लावल्यामुळे मागे गेलेल्या राज्याच्या विकासाची जोरदार घौडदौड सुरू झाली आहे. देशाच्या आर्थिक विकासात हातभार लावण्यासह राज्यात पायाभूत सुविधा उभारणे, उद्योग उभारणे, विदेशी गुंतवणूक आणून त्या माध्यमातून रोजगार निर्मिती करणे असे एक नव्हे अनेक विषयांचे शिवधनुष्य फडणवीसांनी उचलले आहे. मात्र, त्यात अशा प्रकारची प्रकरणे समोर येत गेली की शेवटी व्यक्ती आहे, लक्ष्य विचलित होणारच, भकरटणारच आणि मग त्यामुळे पुन्हा राज्याच्याच विकासाला खीळ बसण्यास ते कारणीभूत ठरेल. त्यामुळे मित्रपक्षांच्या नेतृत्वाने आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीदेखील याची तमा बाळगण्याची गरज आहे.

९२७०३३३८८६

---

## वाचक पत्रे

### वाघ आणि प्राणिरहित जंगल

पूर्व विदर्भात दररोज वाघ हा मानवाला लक्ष्य करीत आहे. हे भयाण वास्तव शासनाच्या नाकर्तेपणावर बोट ठेवणारे आहे. वाघ, वाघाडे, वाघमारे आणि माणूसमारे ही आडनावे धारण करणारे लोकही याच भूमीत आहेत. वाघावर बसलेल्या दुर्गादेवीची पूजा करणाऱ्या समाजाची इतकी दुरवस्था का व्हावी? कारण वाघ मांसाहारी आहे आणि त्याचे भक्ष्य जंगलात नसणे हे एक कारण असू शकते. पशुसंवर्धन खात्याने मांसाहारी लोकांकरिता संकरित कोंबड्या (ब्रायलर, पॅरोट कडकनाथ ) उपलब्ध केल्या तशा संकरित हरणी, सांबर, चितळ व डुकरे वाघाकरिता उपलब्ध करून दिल्या असत्या तर वाघाची भूक शमवण्यासाठी हा प्रामाणिक प्रयत्न झाला असता! यावर पशुवैद्यकीय शास्त्रज्ञ विद्यापीठात काहीतरी पर्याय शोधतील हा एक आशावाद! पूर्वी सर्कशीतील वाघांसाठी वृद्ध बैलांना (गाई नाही ) मारून त्याचे मांस वाघांना देण्यात येत होते. आता लोकांना खाण्याकरिता कत्तलीसाठी शेकडो गोधन पकडले जात आहे आणि न्यायालयात शेकडो प्रकरणे प्रलंबित आहेत (यावर एक कारणमीमांसा बनविणे गरजेचे आहे). माणसाच्या मांसाहाराकरिता ही उठाठेव न करता मांसाहारी वाघाकरिता जंगले प्राण्यांनी गजबजलेली ठेवल्यास वाघ आदमखोर बनणार नाही!



**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

### दहावीनंतर विचारपूर्वक पुढचा निर्णय घ्या

नुकताच दहावीचा निकाल लागला आहे. सर्व विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना आता पुढे काय करायच हा एकच प्रश्न पडलेला आहे. लागलेला निकाल अपेक्षेप्रमाणे असेल किंवा नसेल अशा दोन्ही परिस्थितींमध्ये योग्य निर्णय घेणे आणि भविष्यासाठी योग्य अभ्यासक्रम निवडणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. विद्यार्थी मित्रांनो, दहावी म्हणजे तुमच्या भविष्याच्या मार्गावरील एक वळण आहे. इथूनच तुमच्या पुढील करीअरची दिशा ठरते. त्यामुळे निकाल लागल्यावर आता पुढे काय करायचे, यासाठी काही बाबींवर लक्ष दिल्यास नक्कीच त्याचा फायदा होईल. निकाल हा तुमच्या मेहनतीचं प्रतिबिंब असतो. नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवा, या परीक्षांचे गुण तुमचे भवितव्य ठरवत नाहीत. तुमचे या परीक्षेतील गुण तुमचं अंतिम मूल्यांकन करत नाहीत. त्यामुळे निकाल जसा असेल तसा स्वीकारा. तुमच्या आवडी निवडी, स्वप्न आणि क्षमतांचा विचार करून पुढची दिशा ठरवा. इतर काय म्हणतात त्याऐवजी तुम्हाला काय करायचं आहे हे स्वतःला विचारा. अभ्यासक्रम निवडण्याच्या आधी सर्वांत पहिले स्वतःच्या आवडी निवडी ओळखा. तुम्हाला काय आवडतं, तुमचा रस कशात आहे हे ठळकपणे आपल्या घरच्यांसमोर मांडा. अनेकदा विद्यार्थ्याला शालांत परीक्षेत चांगले गुण असून व त्याच्यात अनेक क्षमता असून देखील केवळ घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे किंवा मार्गदर्शन न मिळाल्यामुळे मनासारख्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येत नाही. अशावेळी विद्यार्थी घरच्यांना आणखी आर्थिक संकटात टाकू शकत नाही. यापेक्षा कमी कालावधीचे डिप्लोमा किंवा कौशल्यपूर्ण व्यावसायिक शिक्षण घेऊन असे विद्यार्थी आधी स्वतःची व घरची परिस्थिती चांगली करू शकतात व पुढील शिक्षण ते त्यानंतरही पूर्ण करू शकतात. तुमच्यात असलेले कौशल्य, उपजत गुण व तुमच्यात असलेल्या क्षमतांना जास्तीत जास्त वाव कोणत्या अभ्यासक्रमात मिळू शकतो याचा शोध घ्या. बारावीनंतर खऱ्या अर्थाने पुढील शिक्षणाचे अनेक पर्याय खुले होतात. अनेक स्किल बेस डिप्लोमा व डिग्रींचा यामध्ये समावेश आहे. परंतु आयुष्यात यशस्वी होण्यासाठी नुसती डिग्रीच आवश्यक नाही तर तुम्हाला त्यासोबतच एखादं विशिट असं स्किल देखील स्वतःमध्ये डेव्हलप करावी लागते. आजच्या प्रगत काळात स्वतःतील स्किल डेव्हलप केल्याशिवाय पर्याय नाही. तुमचं यश हे तुमचे प्रयत्न आणि दृढनिश्चयावर अवलंबून आहे. आपण घेतलेले निर्णय चुकले तर स्वतःवर टीका करू नका. चुकीतून शिकून पुन्हा प्रयत्न करा, तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल.

**सुमेघ रामचंद्र वानरे**/९१३००२१३८७

### सत्पात्री दानाचे महत्त्व!

दान हा शब्द कानावर पडताच, कुणातरी गरजू व्यक्तीला मदतीच्या रूपाने काहीतरी देण्याचे चित्र डोळ्यासमोर येते. हे दान वेगवेगळ्या स्वरूपात असते. जसे की अन्नदान, वस्त्रदान, आर्थिक दान, रक्तदान इत्यादी. हिंदू धर्मात त्यागाला विशेष महत्त्व आहे. धनाचा त्याग म्हणजेच सत्कार्यासाठी धन देणे! आपण जे अर्पण किंवा दान करतो, त्याचे फळ आपल्याला दहापटीने मिळते, असे शास्त्र सांगते. तेव्हा आपण भगवंतासाठी म्हणजेच ईश्वरी कार्यासाठी अर्पण केले, तर त्याचा आध्यत्मिक दृष्टीने मोठा लाभ होतो.



म्हणूनच दान हे नेहमी 'सत्पात्री' असावे, असे म्हटले आहे. तेव्हा अशा संस्था ज्या समाजात अध्यात्म प्रसाराचे कार्य करतात, दान स्वरूपात मिळालेल्या धनाचा उपयोग ईश्वरी कार्यासाठी करतात, अशा संस्थांना दान केल्याने ते निश्चितच 'सत्पात्री' दान असेल असे वाटते.

**वर्षा आवदे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# नांदेडमध्ये अमित शाह यांची २६ ला 'शंखनाद' भव्य जाहीर सभा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२४ मे-**

केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित श९ाह येत्या सोमवारी २६ मे रोजी दुपारी २ वाजता नवा मोंढा, नांदेड येथे भारतीय जनता पक्षाच्या 'शंखनाद' भव्य जाहीर सभेला संबोधित करणार असून, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण आदी नेते सुद्धा मार्गदर्शन करणार असल्याची माहिती खा. अशोकराव चव्हाण यांनी दिली आहे.



केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह यांच्या नांदेड दौऱ्याची माहिती देण्यासाठी नांदेड जिल्हा भाजपच्या वतीने आज झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. याप्रसंगी ते म्हणाले की, केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री २५ ते २७ मे दरम्यान तीन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. नवा मोंढा, नांदेड येथे दुपारी २ वाजता आयोजित 'शंखनाद' भव्य जाहीर सभा हा त्यांच्या दौऱ्याचा मुख्य कार्यक्रम असून, यावेळी माजी प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे, खा.डॉ. भागवत कराड, पालकमंत्री अतुल सावे, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्यासह अनेक आमदार व वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित राहतील. नांदेड जिल्ह्यातील पावसाचे वातावरण लक्षात घेता या सभेसाठी विशाल वॉटरप्रुफ मंडप उभारण्यात आला आहे. वेळेवर पाऊस आला तरीही सुरळीतपणे मोठी सभा होईल, असा विश्वास व्यक्त करून खा. चव्हाण यांनी नागरिकांनी व कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

सोमवारी २६ मे रोजी साधारणतः दुपारी १.१५ वाजता नांदेड येथील श्री गुरु गोबिंदसिंघजी विमानतळावर त्यांचे आगमन होईल. त्यानंतर दुपारी १.३० वाजता वसंतराव नाईक चौक, नांदेड येथे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचे अनावरण अमित शाह यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत होईल. हा पुतळा नांदेड-वाघाळा शहर महानगर पालिकेने उभारला आहे. दुपारी १.४५ वाजता भाग्यनगर रोड, विद्युत नगर चौक येथे राज्यसभेचे खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे. सायंकाळी ६ वाजता नाना-नानी पार्क समोर उभारण्यात आलेल्या भाजप महानगर कार्यालयाचे उद्घाटन अमित शाह व इतर मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. भाजपचे महानगर अध्यक्ष अमरनाथ राजूरकर हे या कार्यक्रमाचे आयोजक आहेत. त्याच रात्री केंद्रीय गृहमंत्री विमानाने मुंबईकडे रवाना होणार असल्याची माहिती खा. अशोकराव चव्हाण यांनी पुढे दिली.

पत्रकार परिषदेला खा.डॉ. अजित गोपछडे, भाजपचे महानगर अध्यक्ष अमरनाथ राजूरकर, दक्षिण ग्रामीण जिल्ह्याचे अध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, प्रवीण साले, विजय गंभीरे उपस्थित होते. पत्रकार परिषदेचे संचालन जिल्हा प्रवक्ते संतोष पांडागळे यांनी केले.

**सैन्य गौरव, खंबीर नेतृत्व, विकसित भारत आणि भाजपच्या निवडणूक सज्जतेचा 'शंखनाद'!**

नवा मोंढा, नांदेड येथील सभेतून 'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत शेकडो दहशतवादी व त्यांच्या तळांचा खात्मा करणाऱ्या भारतीय सैन्याच्या गौरवाचा शंखनाद, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आजवरच्या ११ वर्षांच्या वाटचालीत २०४७ मधील विकसित भारताची भक्कम पायाभरणी केल्याचा शंखनाद, देशाचे गृहमंत्री अमित शाह यांच्या खंबीर नेतृत्वाखाली नक्षलवाद निर्मूलनाबाबत कटिबद्धतेचा शंखनाद आणि महाराष्ट्रातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजपच्या सज्जतेचा शंखनाद होणार असल्याने या सभेला 'शंखनाद' हे नाव देण्यात आल्याचे खा. अशोकराव चव्हाण यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त



### स्व. निरधारी जाधव यांच्या स्मृतिमध्ये आण्णा चौक नाम फलकाचे अनावरण!

**माहुर** -येथील शिवसेना (उबाठा) शहर प्रमुख स्व. निरधारी जाधव उर्फ आण्णा यांच्या हसतमुख स्मृतीज्योति माहूरकरांसह त्यांच्याशी स्नेहांकीत असलेल्या संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील शिवसैनिकांच्या मनात कायम तेवत राहव्यात या आपुलकीच्याभावनेने प्रभाग क्रमांक ०२ मध्ये आण्णा चौक फलकाचे अनावरण शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांच्या हस्ते अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत बुधवारी २१ मे रोजी करण्यात आले.उबाठा गट शिवसेना शहरप्रमुख,माहूर निरधारी जाधव यांचे नुकतेच ०९ मे रोजी धक्कादायक दुःखद निधन झाले. स्व.निरधारी जाधव हे साधारणपणे १९९८ सारी गजानन प्रिंटर्स च्या माध्यमातून व्यवसायात उतरले होते. आपल्या विलक्षण तांत्रिक बुद्धीमतेच्या जोरावर त्यांनी माहूर शहरात स्क्रिन प्रिंटिंगला सुरुवात केली. याही पलीकडे जात सन २००५ पासून हयातीत असेपर्यंत दिवंगत निरधारी यांनी ऑपसेट प्रिंटिंगच्या माध्यमातून तालुका व परिसरातील जनतेला वाजवी दरात विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या. याच दरम्यान एक कुशल संगणक चालक म्हणूनही त्यांनी डिजिटल तंत्रज्ञानाच्या व्यवसायात देखील मोठे नाव कमावले. साधारणतः सन २०१० पर्यंत जोपर्यंत स्मार्टफोन, न्ड्रॉइड या परिसरात पोहचले नव्हते त्याकाळी प्रिंट मिडिया च्या प्रतिनिधिंना तसेच कार्यालयीन कामकाजाच्या निमित्ताने नागरिकांना बातम्या, महत्त्वाची कागदपत्रे ही फॅक्स मशीनद्वारे पाठवावी लागत असे ती संगणकावर टायपिंग करून माहूर शहरात एकमेव निरधारी आण्णाच देत असे. विशेष म्हणजे याच दरम्यान, त्यांनी राजकारणातदेखील पाऊल ठेवले तत्कालीन एकसंध शिवसेनेचे माहूर शहर प्रमुख म्हणून ते २००५ ते २०२५ म्हणजे मृत्यू पर्यंत ते सतत वीस वर्षांच्या दिर्घ काळासाठी राहिले. यावरुनच त्यांनी पक्षासाठी व जनतेच्या अडीअडचणी व सामाजिक कार्यासाठी आपले खुप मोठे योगदान दिले असल्याचे दिसून येते. जाधव हे शिवसैनिक जरी असले तरी सर्वधर्मसमभाव जोपासत ते प्रत्येकाच्या अडिअडचणी सोडवण्यासाठी नेहमीच पुढाकार घ्यायचे. जनसमर्पण भावनेच्या कार्यशैलीवरुन हरहुन्नरी निरधारी जाधव यांना सर्वजण आण्णा म्हणून संबोधित करायचे. अशा कितीतरी जनसेवा स्मृतींच्या ज्योती ह्या स्व.निरधारी जाधवांच्या आहेत.आणि त्या लोकांच्या मनात ताज्यातवान्या स्वरुपात कायम तेवत राहाव्यात या भावनेतून उबाठा शिवसेना जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे अर्थातच शहर,तालुका व संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील तमाम शिवसैनिक व स्नेहांकित परिवाराच्यावतीने स्व. निरधारी जाधव यांच्या पत्नी आशाताई निरधारी जाधव ज्या नगरपंचायतीच्या वार्ड क्रमांक २ च्या विद्यमान नगरसेविका आहेत, प्रभागात खुप मोठ्या प्रमाणावर असलेल्या दिवंगत निरधारी यांच्या चाहता वर्गाच्या इच्छेनुसार निर्णय घेऊन रहदारीस अडथळा होणार नाही अशा ठिकाणी स्व.निरधारी जाधव अमर रहे! अण्णा चौक अशी नामस्मृती दर्शविणाऱ्या नाम फलकाच्या चौकाची स्थापना केली. यावेळी शिवसेना उबाठा जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांचेसह उपजिल्हाप्रमुख अनिल रुणवाल, माजी पंचायत समिती सभापती मारुती रेकुलवार, नगरसेवक विजय कामटकर, प्राध्यापक राजाराम गंदेवाड,जितू चोले,गणेश पुरी, विजय तिवसकर, दीपक कांबळे,अशोक उप्पलवाड कनिष्क वानखेडे, प्रफुल पारसकर, शेख तोफिक,दिपक कामटेवाड, मंगेश सुकळकर,विजय मिरटकर,गोविंद पवार,गणेश इसाय, चिमनाजी लिमकर, शामराव गुजलवाड, शंकर महाराज, गजानन पवार,राजु बाबुलकर,अक्षय मार्गमवार, पत्रकार, व्यावसायिक, विविध पक्षातील राजकीय व्यक्ती यांच्यासह मध्य आशियातील देश किर्गिज़स्तान येथे एमबीबीएसच्या अंतिम वर्षात वैद्यकीय शिक्षण घेत असलेले निरधारी जाधव यांचे चिरंजीव डॉक्टर गौरव जाधव तसेच सदरील अण्णा चौक नाम फलकाच्या स्थापनेसाठी ज्यांचे विशेष योगदान लाभलेले आहेत असे कट्टर शिवसैनिक गजानन चव्हाण, वसीम शेख यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वीज पडून मृत्युमुखी पडलेल्या मयतांच्या कुटुंबियाला चार लक्ष रुपयांची मदत

**नांदेड** -वीज पडून मृत्युमुखी पडलेल्या उमेश उंडाडे व वादळी वाऱ्यात भिंत पडून सुनेगाव येथील मजूर नरसिग पिटलेवाड याच्या घरी जाऊन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे दोन्ही कुटुंबियांच्या घरी गेले त्याचे सांत्वन केले आणि त्यांना प्रत्येकी चार लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश त्यांनी दिला. लोहा शहरातील पाटील गल्लीत राहणारा उमेश उत्तम उंडाडे (वय २६ वर्ष) या तरुणांचा शेतात वीज पडून मृत्यू झाला. त्याच्या कुटुंबियांची ( २३ मे) निवासस्थानी जाऊन भेट घेतली त्याचे सांत्वन केले व चार लक्ष रुपयांच्या शासकीय अनुदानाचा धनादेश दिला ५ मे रोजी सुभाषनगर तांडा (ता.लोहा ) येथे ऍग्रो कंपनीत मिस्त्रीच्या हाताखाली काम करणारा नरसिंग कोंडीबा पिठ्ठलेवाड ( वय २८ वर्ष) याच्या अंगावर भिंत पडली त्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला . .त्याच्या पश्चात पत्नी दोन मुलगे असा आहे सुनेगाव येथील त्याच्या घरी आमदार चिखलीकर यांनी भेट दिली पिटलेवाड कुटुंबीयांचे सांत्वन केले आणि त्यांना चार लक्ष रुपयाचा मदतीचा धनादेश दिला यावेळी प्रभारी उपविभागीय अधिकारी तहसीलदार रामेश्वर गोरे, लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर,माजी नगराध्यक्ष कल्याणराव सूर्यवंशी माणिकराव मुकदम, माजी उपनगराध्यक्ष दता वाले, करीम शेख, भास्कर पाटील पवार, अविनाश पवार, सुधाकर पाटील, राम पाटील पवार, सिंकदर शेख तलाठी परशुराम जाधव आदी उपस्थित होते.

# लोह्यात तिरंगा रॅलीला प्रचंड प्रतिसाद



**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.२४ मे-**

सर्वसमावेशक जनतेच्या वतीने तिरंगा रॉली काढण्यात आली या भव्य तिरंगा रॉलीस जनतेचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला भारत माती की जय ..जय..जवान.. घोषणांनी शहरातील परिसर गजबजला.

पहलगाम येथे अतिरेकी हल्लूया झाला या हाल्यात निष्पाप नागरिकाचा बळी गेला याचा बदला देशाच्या विर सैनिकाने शंभर फुट बॉर्डर मध्ये घुसुन शत्रूच्या सैन्याला जशासतशे प्रत्युत्तर दिले अभिमान गौरवस्पद घटना आहे. भारत देशाच्या वीर जवानांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी भव्य तिरंगा ध्वज घेऊन रॉलीचे आयोजन करण्यात आले होते.

जुन्या लोह्यातील छ. शिवाजी महाराज स्मारकाल अभिवादन करुन मुख्य रस्त्याने नगर.परिषद आवारातील महात्मा बसवेश्वर महाराज स्मारकाल अभिवादन करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकास पुष्पमाळा आर्पन करुन क्रांतिसूर्य बुध्द विहार येथे तिरंगा रॉलिचा समारोप झाला.

तिरंगा रॉली यशस्वी करण्यासाठी लोहा कंधार मतदार संघाचे एकनाथ दादा पवार, माजी नगराध्यक्ष गजानन सावकार सुर्यवंशी, माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील सुरनर, माजी जिल्हा परिषद सदस्य विजय धोंडगे, सरपंच पुंडलिकराव पाटील बोरगावकर ,चित्रलेखाताई गोरे, भगवान राठोड, माजी नगरसेवक युवराज वाघमारे, जेष्ठ कार्यकर्ते गंगाधरराव महाबळे,माजी नगरसेवक संदीप दमकोंडवार, माजी नगरसेवक नबीसाब शेख, माजी नगरसेवक अमोल व्यवहारे, डी.एन.कांबळे,संजय चव्हाण ,युवा नेते लक्ष्मण फुलवरे, वैभव हाके ,यशपाल निर्मले,जयपाल निर्मले, आशिष व्यवहारे, गोविद वड ,काशीनाथ शेटे, मन्मथ नाईकवाडे, पिनु चुडावकर, संजय रहाटकर, बाळासाहेब कतुर यासह अनेक तरुण महिला सहभागी होत्या.

# घरकुल लाभार्थ्यांना वाळू मोफत वाटपाचा नांदेड जिल्ह्यात माहूर तालुक्यातून शुभारंभ

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.२४ मे-**

महाराष्ट्र शासनाच्यावतीने प्रधानमंत्री आवास योजनेसह सर्व प्रकारच्या घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याचा शासनाच्या अभिनव अशा स्वप्नपूर्ती संकल्पाचा शुभारंभ आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार किशोर यादव यांनी मौजे पडसा, वडसा व टाकळी येथून शनिवारी केला.



घरपोच मोफत पाच ब्रास वाळू मिळत असल्याने घरकुल लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. शासनाच्या या अभिनंदनिय उपक्रमाबद्दल घरकूल लाभार्थ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले,आमदार भिमराव केराम, सहाय्यक जिल्हाधिकारी झेनीथ चंद्र दोंथूला आणि तहसिलदार किशोर यादव यांचे आभार मानले आहे. सोमवार २६ मे पासून माहूर शहरासह तालुक्यातील घरकुल योजनेच्या सर्व लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करून देणार असल्याचे तहसिलदार यादव यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दि.८ व ३० एप्रिल रोजी घेतलेल्या मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार महाराष्ट्रातील मंजूर असलेल्या सर्व घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना उपलब्ध होईल तिथून पाच ब्रास मोफत वाळू देण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार राज्याच्या सर्व जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यात घरकुल लाभार्थ्यांना वाळू देण्यासाठी वाळू उपलब्धतेची चाचणी करण्यात येत होती. त्यानुसार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, सहाय्यक जिल्हाधिकारी झेनीथ चंद्र दोंथूला यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार किशोर यादव,नायब तहसीलदार डॉ. राजकुमार राठोड, नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी सर्व मंडळ अधिकारी, तलाठ्यांना सोबत घेऊन वाळू स्त्रोतांची पाहणी करून दि.२४ मे रोजी मौजे पडसा येथून मोफत वाळू वाटप योजनेचा शुभारंभ केला.

यावेळी आमदार भीमराव केराम यांनी लाभार्थ्यांना दूरध्वनीवरून या योजनेच्या लाभ प्राप्तीबद्दल शुभेच्छा दिल्या. यावेळी तहसीलदार किशोर यादव,नायब तहसीलदार डॉ. राजकुमार राठोड,सरपंच रुखमाबाई आरके,भाजपाचे तालुका अध्यक्ष निळकंठ मस्के,भाजपाचे ज्येष्ठ नेते अनिल वाघमारे,नगरसेवक गोपू महामुने,उपसरपंच बाबाराव चौधरी, विलास पाटील चौधरी, प्रकाश गायकवाड,किसनराव मारबते, नंदकुमार जोशी, विजय आमले, हर्षदीप दीक्षित,कुलदीप घोडेकर, आनंदा हिंगाडे, निलेश तायडे, अविनाश भोयर,विनायक मुसळे,शेख इमरान, जितू चोले, शेख मोईज तसेच लाभार्थी बंडू शेवाळे,शेंडे, शुभम भवरे यांचेसह लाभार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोणत्याही प्रशासकीय कार्यात एक कर्तव्यकार्यतत्पर तालुका प्रशासकीय अधिकारी म्हणून महसूल प्रशासनात तर वेळोवेळी सर्वसामान्यांच्या हिताचे तडकाफडकी निर्णय घेत जनतेच्या मनात आदराचे स्थान निर्माण केलेले माहूरचे तहसीलदार किशोर यादव यांनी यावेळीही घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना मोफत वाळू वाटप करण्यात धडाकेबाज निर्णय घेत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून सर्वात प्रथम पुढाकार घेऊन माहूर तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना सर्वात आधी वाळू उपलब्ध करून दिल्याबद्दल,त्यांचा वडसा,पडसा व टाकळी या तिन्ही गावातील नागरिकांकडून जाहीर सत्कार करण्यात आला.

## आ. चिखलीकर यांच्या उपस्थितीत मारतळा येथे आज ग्राम दरबार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२४ मे-**

शासनाच्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि ग्रामीण भागातील जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आज मारताळा येथे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या ग्राम दरबारचे आयोजन करण्यात आले आहे. ए.के. संभाजी मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या या ग्राम दरबारला नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले आहे.

या ग्राम दरबारला गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहा ,उपअभियंता महावितरण, लोहा ,उपअभियंता, पाणी पुरवठा, जि.प. लोहा, उपअभियंता जीवन प्राधिकरण नांदेड, उपअभियंता सा.बां. उपविभाग लोहा ,उपअभियंता जि. प. बांधकाम विभाग, लोहा, उपअभियंता पाटबंधारे विभाग विष्णुपूरी लिंबोटी , उपअभियंता ल. पा. जि. प., लोहा ,वन परीक्षेत्र अधिकारी सामाजिक वनीकरण, लोहा ,वन परीक्षेत्र अधिकारी प्रादेशीक वनविभाग आदीसह अन्य विभागाचे अधिकारी उस्थित राहणार आहेत.

# स्वारातीम विद्यापीठाच्या जैविकशास्त्रे पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया प्रवेशपूर्व परीक्षा ३ व ४ जूनला होणार

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.२४ मे-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील जैविकशास्त्रे संकुलातील विविध विषयाच्या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना २ जून पर्यंत ऑनलाईन पद्धतीने नाव नोंदणी करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आणि दि. ३ व ४ जून रोजी प्रवेशपूर्व परीक्षा घेण्यात येणार असल्याचे संकुलाचे संचालक डॉ. बी. एस. सुरवसे यांनी कळविले आहे.

जैविकशास्त्रे संकुलामध्ये वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान आणि वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञान (डी.एम.एल.टी.) या विषयाचे पदव्युत्तर अभ्यासक्रम चालतात. या अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याकरिता विद्यार्थ्यांना प्रवेशपूर्व परीक्षा देणे बंधनकारक आहे. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना २ जून पर्यंत नाव नोंदणी करण्याची संधी विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेली आहे. आणि प्रवेशपूर्व परीक्षा विषयनिहाय आयोजित करण्यात आलेली आहे.


दि. ३ जुन रोजी दुपारी १२ ते १:३० या वेळेत एम.एस्सी. वनस्पतिशास्त्र तर दुपारी २ ते ३.३० या वेळात एम.एस्सी. प्राणिशास्त्र या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची प्रवेशपूर्व परीक्षा आयोजित करण्यात आलेली आहे. आणि ४ जून रोजी दुपारी १२ ते १:३० या वेळेत एम.एस्सी. सूक्ष्मजीवशास्त्र तर दुपारी २ ते ३.३० या वेळेत एम.एस्सी. जैवतंत्रज्ञान तसेच दुपारी ४ ते ५.३० या वेळेत वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञान या विषयासाठी प्रवेशपूर्व परीक्षा गणितीयशास्त्रे संकुलामध्ये घेण्यात येणार आहे.

जैविकशास्त्रे संकुलातील विविध विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेशासाठी ऑनलाईन पद्धतीने नाव नोंदणी सुरु आहे, ही प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र शासनाच्या ई-समर्थ पोर्टलवर (https://srtmunadm.samarth.edu.in) आणि विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याची माहिती संकुलाचे संचालक डॉ. बी. एस. सुरवसे यांनी दिली आहे.

# कृषी विभागाने शेतकऱ्यांची हेळसांड करू नये : आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.२४ मे-**

लोहा -कंधार तालुका कृषी विभागाच्या गेल्या पाच वर्षात प्रचंड मरगळ आली आहे. दौऱ्याच्या नावाखाली कार्यालय कोणीच वेळेवर उपस्थित राहत नाहीत.शेतकऱ्यांना शेती बांधावर जाऊन मार्गदर्शन करत नाहीत.त्यांना शासकीय योजनांचा फायदा मिळून देण्यात परिपूर्णता नाही.माती परीक्षण , पीक उत्पादन वाढीसाठी उपाययोजना केल्या जात नाहीत .बियाणे उगवले नाही किंवा पिकांना फळधारणा झाली नाहीत तर त्या संबधित कंपनीवर कार्यवाही होत नाही आणि शेतकऱ्यांना मदत मिळवून दिली जात नाही.खत टंचाई निवारण वेळीच नाही .दोन्ही अधिकारी आणि त्याच्या कर्मचाऱ्यांचे काम असमाधानकारक असून यापुढे त्यात सुधारणा व्हावी अन्यथा कार्यवाहिला सामोरे जावे लागेल ,।शेतकऱ्यांची हेळसांड सहन केली जाणार नाही या भाषेत आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी कृषी विभागाचे खरडपट्टी काढली.



लोहा व कंधार तालुका कृषी विभागाची खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर याच्या उपस्थितीत श्रीनिवास हॉल लोहा येथे पार पडली यावेळी माजी नगराध्यक्ष कल्याणराव सूर्यवंशी, जिल्हा अधिकक्ष कृषि अधिकारी दतकुमार कळसाईत,जिल्हा परिषद कृषी अधिकारी अनिल शिरफुलें, कंधार प्रभारी उपविभागीय अधिकारी तहसीलदार रामेश्वर गोरे, तहसीलदार विठ्ठल परळीकर, युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर, माणिकराव मुकदम, कंधार बीडीओ महेश पाटील , जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपअभियंता शिवाजी राठोड, कंधार तालुका कृषी अधिकारी अनिल वाढोरे, आयोजक लोहा तालुका कृषी अधिकारी सदानंद

पोटपल्लेवार,माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे, माजी सभापती बाबुराव केंद्रे उमरगेकर, माजी उपनगराध्यक्ष दता वाले , माजी गटनेते करीम शेख, कृषी अधिकारी (प स) वाव्हूळे , वजन व मापे निरीक्षक एस जी धुमाळ कृषी अधिकारी एल. एम. हांडे, बी. डी. जाधव, हरिभाऊ चव्हाण ,दिनेश तेल्लवार, माजी नगरसेवक भास्कर पाटील, राष्ट्रवादी कोंग्रेसचे शहराध्यक्ष राम पवार, कृषी दुकान संघटनेचे माधव सूर्यवंशी,मस्कीकर यासह पदाधिकारी, , शेतकरी, कर्मचारी उपस्थित होते

आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर याच्या समोर कृषी विभागाचा फोलपणा उघड झाला .कोणतीच माहिती नीट नव्हती. विचारले ते सोडून अधिकारी व संबधीत दुसरेच सांगत होते.मागील पाच वर्षात या दोन्ही तालुक्यात कृषी विभागाने शेतकऱ्यांची प्रचंड हेळसांड केली कार्यालयात राहत नाहीत अन गावात शेतकऱ्यांच्या बांधावर जात नाहीत असे यापुढे चालणार नाही असा सज्जड इशारा आमदार चिखलीकर यांनी या विभागाला दिला तेव्हा उपस्थित शेतकऱ्यांनी टाळ्यांचा गजर करत त्याच्या निर्णयाचे जणू स्वागतच केले

लोहा व कंधार तालुका कृषी अधिकारी व त्याच्या कर्मचाऱ्याचे काम असमाधानकारक आहे त्यात सुधारणा व्हावी दर सोमवारी सर्व जणांनी कार्यालयात हजर असावे पीक उत्पादन वाढीसाठी ववेळेवर माहिती दिली जात नाही .कर्मचारी दौऱ्याच्या नावाखाली गावात जात नाहीत .शासकीय योजनांचा फायदा लाभार्थ्यांना मिळत नाही असे यापुढे चालणार नाही. पाच वर्षांत जी मरगळ आली ही आता चालणार नाही .शेतकऱ्यांची हेळसांड सहन केली जाणार नाही असा शब्दात त्यांनी कृषी विभागाला फटकारले. दिनेश तेल्लवार याना शेततळे नेटसेट चे मी खासदार होतो आता आमदार झालो तरी मिळाले नाही ही अंत्यत खेदाची बाब होय या शब्दात त्यांनी कृषी विभागाच्या कामावर नाराजी व्यक्त केली .जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी विविध योजनांची माहिती दिली.सेवानिवृत्त तालुका कृषी अधिकारी माणिकराव मुकदम यांनी मार्गदर्शन केले. तालुका कृषि अधिकारी सदानंद पोटपल्लेवार, कंधार चे भारत वाढोरे यांनी आढावा सादर केला आरंभी आ चिखलीकर व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला .शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचा प्रतापराव पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

## संक्षिप्त

### मंठा येथे राज्यस्तरीय शिवसेना ओबीसी-व्हीजेएनटी संवाद मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा मंठा / प्रतिनिधी** शिवसेनेचे महाराष्ट्र राज्याचे ओबीसी–व्हीजेएनटी सेलचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंठा येथील शिवसेना तालुकाप्रमबोराडे यांच्या कार्यालयात संवाद मेळाव्याचे आयोजन शनिवार (दि.२४) रोजी करण्यात आले. पक्षप्रमुख एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना धनगर, भटके विमुक्त, ओबिसी, बारा बलुतेदार या समाजाच्या वेगवेगळ्या जातींच्या कल्याणकारी योजना, महामंडळे व कल्याणकारी शासननिर्णय त्यांच्याद्वारे घेण्यात आली.या विकासाच्या व कल्याणकारी योजनांचा प्रसार करणे हे संवाद दौऱ्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. तसेच ओबीसी समाजाचे मायक्रो प्लॅनींग करुन त्यांच्या समस्या सोडविण्याचे काम येत्या काळात आम्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाने अधिक जलद गतीने करणार आहोत. ओबीसी प्रवर्गात काही मुख्य जाती वगळल्यास इतर छोट्या छोट्या जातींमधील लोकांच्या अनेक समस्या आहेत आणि त्या जाती मुख्य प्रवाहापासून दुर्लक्षित आहे म्हणून यासर्व वंचित समाजाशी संवाद साधण्यासाठी व त्यांच्या समस्या जाणुन घेण्यासाठी ह्या ओबीसी – व्हीजेएनटी संवाद दौऱ्याचे ३३ दिवस ३३ जिल्ह्यात अयोजन करण्यात आले आहे. या सर्व मायक्रो जातीतील जनतेला शिवसेनेशी घट्ट जुळवन्याचे काम आम्ही या माध्यमातून करत आहोत असे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांनी यावेळी सांगितले. यावेळी शिवसेना तालुका प्रमुख बोराडे,सोलापुर जिल्हा प्रमुख सुयश करचे,सातारा जिल्हाप्रमुख हेमंत भोईटे,पुणे जिल्हाप्रमुख योगेश धरम,महिला उप जिल्हा प्रमहिला तालुका प्रमुख सुनीता देशमुख,सविता गवली,उप तालुका प्रमुख उपस्थिती होती.



### परतुर शहरातील नपने तात्काळ मान्सूनपूर्वचे कामे पूर्ण करावीत - ॲड . सुरेश काळे

**तभा वृत्तसेवा परतुर / प्रतिनिधी** पाऊसाळा जुन महिना जवळ आला असून परतूर शहरातील पाऊसाचे पाणी व व्यवस्थापन तसेच स्वच्छतेचे तिन तेरा वाजलेत परतुर नगर परिषेदेचे मुख्याधिकारी यांना शहरातील नागरी समस्येशी काही देणे घेणे नाही असे चित्र निर्माण होत आहे . परतूर नगर परिषदेने कोणतेही पाऊल अदयापही उचलेले नाही म्हणून शहरातील नाली वाहनारे ओढे त्यातील असणारा कचरा जाग्यावर जमलेला असुन नाली व ओढे मधील घाण ही रस्त्यावर येत असुन शहरातील कामासाठी येजा करण्यासाठी व शहरातील रहिवाशी असणाऱ्या बांधव भगीनी यांना यांच्या घरासमोर दुषीत पाण्याचा सामना करावा लागत आहे. अवकाळी पाऊसामुळे शहरात जमा झालेला कचरा व गाळामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे व येणाऱ्या जुन मान्सुन पुर्वी नगर परिषद प्रशासनाने या विषयी गांर्भीयपुर्वक दखल घेवून तात्काळ कार्यवाही करावे व परतूर शहरातील नागरीकांना होणाऱ्या त्रासा पासून सुटका करावी अशी हाक परतुर करांची आहे .सावता काळे,ॲड.सुरेश रामाजी काळे,नरेश रामभाऊ कांबळे,अर्जुन जगताप,अजित पोरवाल, डॉ.स्वप्नील मंत्री आनंद कोटेचा,पुनमचंद फूलमाळी,कुणाल बन्सिले,सौरभ नरवैये,अविनाश राऊत,अविनाश खरात,सौरभ बगड़िया, आनंद कोटेचा, अजित पोरवाल, सोमनाथ हजारे, गौतम कोटेचा, आकाश काबरे, रवी मुंदडा, डॉ शीतल लाहोटी, सचिन काटे, नारायण मुंदडा, अनिरुद्ध कातारे, अमोल अग्रवाल, बाळू सोळंके, रवी दायमा, बालाप्रसाद जेथलिया, डॉ दिपक कंदोई, जयवंत हतवनकर, दुर्गेश पोद्दार,अनिल अग्रवाल, योगेश खंडेलवाल, आनंद बगड़िया, अभिजीत जोशी,प्रशांत डोम आदी मान्यवर निवेदन देताना उपस्थित होते .



# सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत थायरॉईड निदान अभियान
## वर्षभर चालणाऱ्या अभियानात १० हजार चाचण्यांचे उद्दिष्ट-डॉ. राजेश सेठीया

तभा वृत्तसेवा जालना / प्रतिनिधी

सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत थायराइड निदान अभियान राबविण्यात येणार असून, प्रकल्प प्रमुख रुबी हॉस्पिटलचे संचालक डॉ. राजेश सेठीया यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभरात १० हजार थायरॉईड चाचण्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडिया यांनी दिली. २५ मे हा जागतिक थायरॉईड दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून या अभियानाची रूपरेषा विषद करताना श्री. बगडिया म्हणाले की, १ जुलै २०२५ डॉक्टर डे पासून ३० जून २०२६ असे वर्षभर थायरॉईड निदान अभियान राबविले जाणार असून, या अभियानासाठी रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या नूतन अध्यक्ष डॉ. प्रतिभा श्रीपत, सचिव पंकज लड्ढा, इंद्रायणी पॅथॉलॉजीचे डॉ. जितेंद्र बारगाजे, डॉ. संदीप कुलकर्णी यांचे सहकार्य लाभणार आहे. या आजाराचे वेळीच निदान होणे गरजेचे आहे; अन्यथा अनेक संभाव्य धोके असतात. शासन आणि विविध सेवाभावी संस्था अनेक आजाराबाबत निदान मोहीम, अभियान राबवितात. मात्र, थायरॉईड निदान दुर्लक्षित आहे. सर्वसामान्य जनता अद्यापही थायरॉईडबाबत अनभिज्ञ आहे. विशेष करून या चाचण्या महागड्या असल्याने, सर्वसामान्य जनता स्वतःहून निदान करण्यासाठी पुढाकार घेत नाहीत.

> थायरॉईड विकाराचा सर्वाधिक फटका महिलांना बसतो. सध्याच्या आकडेवारीनुसार भारतात थायरॉईडचे प्रमाण महिलांमध्ये ८९ टक्के असून पुरुषांमध्ये केवळ ११ टक्के आहे. शासकीय आकडेवारीनुसार भारतात ४ कोटी २० लाख थायरॉईडचे रुग्ण आहेत. प्रत्यक्षात या आजाराबाबत अनभिज्ञ असलेले व निदान न केलेले असे १० ते १५ कोटी लोक आहेत. त्यांचा शोध घेणे म्हणजेच निदान होणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने देश पातळीवर शासन स्तरावरून विशेष मोहीम राबवली जाणे गरजेचे आहे. विशेषतः महिलांमध्ये वंध्यत्वासारख्या गंभीर समस्या ह्या थायरॉईड ग्रंथीच्या असंतुलनामुळेच उद्भवतात. या विकारामागे आयोडीनची कमतरता हे मुख्य कारण आहे. अद्यापही अनेक कुटुंबांमध्ये खडे मीठ वापरले जाते, ज्यामध्ये आयोडीनचे प्रमाण अत्यंत कमी असते. त्यामुळे खडे मीठ टाळून आयोडीनयुक्त मीठाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. शिवाय आधुनिक जीवनशैलीतील व्यायामाचा अभाव, फास्ट फूडचे अतिसेवन आणि असंतुलित आहार हे देखील थायरॉईड वाढण्याची प्रमुख कारणे आहेत. त्यामुळे शरीरातील बदलांबाबत सजग राहणे, वेळेवर निदान करून घेणे आणि निरोगी जीवनशैली अंगीकारणे आवश्यक आहे.
>
> **– डॉ. राजेश सेठीया**
> **अभियान प्रकल्प प्रमुख**



पन्नालाल बगडिया



डॉ. राजेश सेठीया

वेळेवर निदान होऊन उपचाराने पुढील संभाव्य गुंतागुंतीचे आजार टाळण्याच्या उद्देशाने आम्ही विशेष अभियान राबवणार आहोत. यापूर्वी रोटरी इंटरनॅशनलचे डायबिटीज डायरेक्टर डॉ. राजेश सेठिया यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण प्रांतात राबविण्यात आलेल्या ''अब की बार एक लाख पार'' या मोफत मधुमेह निदान अभियानाची यशस्विता पाहता, प्रकल्प प्रमुख डॉ. सेठीया यांच्या संकल्पनेतून वर्षभर मोफत थायरॉईड निदान अभियान राबविण्याचा निर्णय ट्रस्टने घेतल्याची माहिती पन्नालाल बगडिया यांनी दिली. या अभियानासाठी ग्रामीण आणि शहरी भागात जिल्हाभर जनजागृती केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. या अभियानाचे प्रकल्प प्रमुख डॉ. सेठीया म्हणाले की, सामाजिक दायित्वातून सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बागडिया यांचे शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक उपक्रमासाठी नेहमीच योगदान लाभत आलेले आहे. रोटरीच्या प्रांत स्तरावरील ''अब की बार एक लाख पार'' या मोफत मधुमेह निदान अभियानात ३० हजार मधुमेह तपासणी किट्सचे योगदान सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया ट्रस्टचे राहिलेले आहे. आता ट्रस्टमार्फत राबविले जाणारे मोफत थायरॉईड निदान अभियान अत्यंत स्तुत्य ठरणार असून, असे सांगून ते म्हणाले की, थायरॉईड ग्रंथीच्या कार्यातील बिघाडामुळे वजन वाढणे किंवा घटणे, थकवा, केस गळणे, मासिक पाळीतील बदल, त्वचा कोरडी किंवा जाड होणे, मानसिक अस्वस्थता, वंध्यत्व, हृदयविकार, हाडांचे आजार अशी अनेक लक्षणे दिसून येतात. वेळीच निदान न झाल्यास थायरॉईड विकार गुंतागुंतीचे स्वरूप धारण करतो. विशेषतः महिलांमध्ये त्याचे प्रमाण जास्त असून, गरोदरपणात आई व बाळ दोघांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. आयोडीनची कमतरता, औषधांचे दुष्परिणाम, व्यायामाचा अभाव आणि आधुनिक जीवनशैली ही यामागील प्रमुख कारणे आहेत. थायरॉईड आजाराचे वेळीच निदान झाले नाही तर भविष्यात होणाऱ्या गुंतागुंती टाळणे कठीण होते. त्यामुळे मोफत चाचण्या उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. जर तुम्हाला ही लक्षणे दिसत असतील तर या अभियानात मोफत थायरॉईड तपासणी करून घ्यावी, असे आवाहन डॉ. सेठिया यांनी केले आहे.

> थायरॉईड चाचण्या सामान्यांसाठी खर्चिक असतात, म्हणून त्याकडे दुर्लक्ष होते. या पार्श्वभूमीवर, गरजू आणि अनभिज्ञ लोकांसाठी हे अभियान जीवनदायिनी ठरणार आहे. समाजासाठी काहीतरी चांगले करावे, याच भावनेतून आम्ही हा उपक्रम सुरू करत आहोत. आरोग्य, शिक्षण आणि समाजसेवा यामध्ये सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचा सहभाग यापुढेही असाच सुरू राहील.पन्नालाल बगडिया अध्यक्ष, सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्ट


# रिक्षाचालकांच्या मुलांची पोलिस दलात निवड

**तभा वृत्तसेवा अंबड /प्रतिनिधी**
अंबड तालुक्यातील भांबेरी येथील रीक्षा चालवुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करणार्या सादिक सय्यद याच्या मुलाची राज्य राखीव पोलीस दलामधे निवड झाली आहे .याबाबात अधिक माहिती अशी की भांबेरी ता. अबंड येथील आदिल सादिक सय्यद याची राज्य राखीव पोलीस दलामधे निवड झालेली आहे ,आदिलचे १ ली ते १२वी पर्यंतचे शिक्षण ग्रामीण भागातील भांबेरी येथेच झाले असुन परीस्थितीचा बाउ न करता ध्येयाकडे लक्ष ठेउन मेहनत घेतल्यामुळेच हे यश मिळाल्याची भावना आदिलच्या आई वडीलांनी व्यक्त केली ..आदिलचे वडील रीक्षा चालवतात तर आई शहनाज सादेक सय्यद या मोलमजुरी करतात .. भांबेरी ग्रामस्थांनी आदिलची ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक काढली .या यशाद्दल आदिलचे परिसरातून कौतुक होत आहे तसेच श्री भाउसाहेब कनके , सजंय कनके,सहदेव भारती , नारायण कनके , सुभाषराव भोईटे,रजनिश कनके ,तात्यासाहेब ठोंबरे, राजेंद्र कनके ,अन्नासाहेब कनके , अशोक केजभट, दादासाहेब कनके , सजंय केजभट, बाळासाहेब कनके तुळशीराम केजभट यांनी सत्कार करुन अभिनंदन केले आहे व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




# मंठा तालुक्यात सहकार जागृती चळवळ राबविणार श्रीमती तुळसा जाधव

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/ प्रतिनिधी** सन २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून शासनाने जाहीर केले असून '' सहकारातून समृद्धीकडे '' या अनुषंगाने सहकार खाते वर्षभर सहकार जागृती चळवळ राबविणार असल्याचे मंठा येथील सहाय्यक निबंधक श्रीमती तुळसा जाधव यांनी सांगितले. येथील बाजार समितीच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत श्रीमती जाधव बोलत होत्या. यावेळी सहाय्यक अधिकारी सी.जी. घावटे यांची उपस्थिती होती. पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, मंठा तालुक्यात सहकार विषयक जागृती अत्यंत कमी आहे आणि सहकार चळवळ वाढल्याशिवाय समाजाचा एकूण विकास होणार नाही म्हणून शासनाने जाहीर केल्याप्रमाणे सन २०२५ हे वर्ष मंठा तालुक्यातील सर्व पतसंस्थांच्या माध्यमातून सहकार चळवळ राबविणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सहकार चळवळीचा एक भाग म्हणून ३० मे २०२५ रोजी प्रियदर्शनी सहकारी बँकेचे मुख्य अधिकारी सचिन वाणी यांचे सहकार जागर या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. त्याचबरोबर वर्षभरात सहकार जागृती व्याख्यान, वृक्षारोपण कार्यक्रम, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पथनाट्य, रक्तदान शिबिर, सहकार दिंडी / स्वच्छता अभियान, सहकार निबंधक व्याख्यान आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी सहकार जागृती कार्यक्रमाचा लाभ घेऊन सहकार चळवळ गतिमान करावी असे आवाहन सहाय्यक निबंधक श्रीमती तुळसा जाधव यांनी केले आहे.



# आवकाळीने शेतकऱ्यांच्या सोलार पॅंनल चे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी /प्रतिनिधी**
जाफाबाद तालुक्यातील डोलखेडा शिवारात झालेल्या बेमोसमी पाऊसाने शेतकऱ्यांच्या विहिरी वरील अनुदानित सोलार पॅंनल चे मोठ्या प्रमाणावर मोडतोड झाली असून , प्रचंड प्रमाणात नुकसान झाली आहे .जाफाबाद तालुक्यातील डोलखेडा खु. येथील शेतकरी मनमोहन भगवान डोईफोडे यांच्या गट नबंर ७१ मध्ये अवकाळी वादळी वारा पाऊस झाल्याने विहीरीवरील कुसुम योजनेत शासनाने दिलेल्या शेतकऱ्यांना विहीरीवरील सोलार पॅंनल चे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा रात्रीच्या अंधारात शेताला पाणी देण्याचे मोठे संकट उभे राहिले . सदरील शक्ती कंपनी च्या अधिकार्यांनी प्रत्येक्ष घटनास्थळी पाहणी करून आवकाळी वादळ पाऊसाने झालेल्या सोलार पॅंनल ची पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी मनमोहन भगवान डोईफोडे यांनी एका निवेदनाद्रारे संबधीत कंपनीकडे केली आहे. मे महिन्यात झालेल्या आवकाळी पाऊसामुळे अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. यामध्ये काहीचे गुरे , बैल, बकऱ्या , विद्युत पंपाचे लाईट चे पोल सह विहीरी सुध्दा धसाळल्या आहे . यामुळे शेतकऱ्यांवर ओढलेले असामी संकटातून शासनाने आर्थिक मदत करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.



# वस्त्रोद्योग मंत्री ना .संजयजी सावकारे यांचा भाजप कार्यालयात भाजप पदाधिकाऱ्यांशी संवाद !

**तभा वृत्तसेवा जालना / प्रतिनिधी**
२३ मे २०२५ : महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री मा.ना.श्री. संजयजी सावकारे यांचा आज जालना जिल्हा दौरा झाला. या निमित्ताने त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यालयात सकाळी १०.०० वाजता भाजपच्या जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद बैठक घेतली. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व जयंतीनिमित्त सुरु असलेल्या उपक्रमाबाबत मार्गदर्शन केले.या बैठकीत पक्षाच्या संघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांच्या अडचणी, स्थानिक पातळीवरील विकासकामे, तसेच जालना जिल्ह्यातील वस्त्रोद्योग क्षेत्रातील संधी आणि आव्हानांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. मंत्री महोदयांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''विकासाचा प्रत्येक भाग हा कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागातूनच शक्य आहे. सरकार आपल्या सोबत असून, जनतेच्या हितासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.या प्रसंगी भाजप महानगर जिल्हाध्यक्षांनी बोलताना म्हणाले की, ''अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्त विविध उपक्रम पक्षाच्या वतीने सुरु आहेत, अहिल्याबाई होळकर यांनी जनतेच्या कल्याणासाठी केलेले कार्य, न्यायनिष्ठा आणि सत्तेचा लोकहितासाठी वापर, हे आजच्या काळातही प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यशैलीचा आदर्श घेऊनच आपण कार्यकर्त्यांनी समाजात आपले योगदान द्यावे. तसेच आपल्या पक्षाचे बळ हे कार्यकर्त्यांच्या निष्ठेवर आणि लोकांच्या विश्वासावर उभे आहे. मत मांडा व पक्ष वाढवा ही आपली भूमिका असून, प्रत्येक कार्यकर्ता मतदारांपर्यंत पक्षाच्या धोरणांची माहिती पोहोचवण्यासाठी सदैव तत्पर राहिला पाहिजे. जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पक्षवाढ ही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून ती एक सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने गावपातळीवर पक्षाची सेवा करताना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करावा. विकास आणि विश्वास हे आपल्या कार्याचे सूत्र असले पाहिजे. यावेळी रामेश्वर भांदरगे, विजय कामड, विमलताई आगलावे, बद्रीनाथ पठाडे, अशोक आण्णा पांगारकर, देविदास कुचे, सतीश जाधव, सुनील आर्दड, सोपान पेंढारकर, चंपालाल भगत, सर्जेराव जाधव, अर्जुन गेही, धनराज काबलिये, कपिल दहेकर, संध्याताई देठे, शुभांगीताई देशपांडे, अरुणाताई जाधव, सखुबाई पणबिसरे, स्नेहा जोशी, सुषमा खरात, शारदा काळे, सुनील खरे, संजय डोंगरे, प्रदीप पवार, रवींद्र अग्रवाल, दिपक ठाकूर, सुनील पवार आदीसह सर्व मोर्चा, नगरसेवक, मंडळ अध्यक्ष, प्रकोष्ट / सेल / आघाडी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




# जालना शहरात हिरकणी महोत्सवाचे आयोजन; महिलांसाठी होम मिनिस्टर कार्यक्रमासह विविध भरगच्च कार्यक्रमाची मेजवानी

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**
जालना येथील उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दि. २६ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, टाऊन हॉल, जुना जालना येथे महिलांसाठी हिरकणी महोत्सव आयोजित करण्यात आला असून या महोत्सवात महिलांच्या आवडीचा होम मिनिस्टर कार्यक्रम होणार आहे. तसेच महिलांसाठी विविध योजना आणि माहितीचे स्टॉल देखील या ठिकाणी राहणार आहेत. त्यामुळे या कार्यक्रमाला सर्व महिलांनी उपस्थित रहावे असे संस्थेच्या अध्यक्षा सौ. करुणा अच्युत मोरे यांनी केले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते करण्यात येणार असून कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जालना समाजकार्य महाविद्यालयाचे प्रचार्य डॉ. राजकुमार म्हस्के यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुने म्हणून पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, गटविकास अधिकारी संदीप पवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांची उपस्थिती राहणार आहे. उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने संस्थेच्या ५ व्या वर्धापण दिनानिमित्त हिरकणी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान महिला सक्षमीकरण अभिया अंतर्गत संस्थेच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या हिरकणी सुरक्षा अभियानाची सुरुवात देखील हिरकणी महोत्सवात होणार आहे. हिरकणी सुरक्षा अभियान अंतर्गत १९ ते ३५ वयोगटातील मुली आणि महिलांची मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षण आणि स्वसंरक्षण प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येणार आहे. दरम्यान महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर ठेवण्यात आले आहे. महिला आणि बालकांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती देणारे स्टॉल आणि अर्ज कार्यक्रमाच्या स्थळी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. महिलांच्या आवडीचा आणि पसंतीचा होम मिनिस्टर कार्यक्रम देखील आयोजित केला असून त्यात महिलांना पैठणी, चांदीचं नाणं, रोख रक्कम जिंकता येणार आहे. यावेळी राज्यभरातील विविध क्षेत्रात काम करणार्या कर्तबगार महिलांचा हिरकणी पुरस्काराने गुणगौरव होणार आहे. कार्यक्रमासाठी आलेल्या पहिल्या २०० महिलामधून ३ भाग्यवान विजेत्या महिलांना पैठणी मिळणार आहे. कार्यक्रमाचे खास आकर्षण झी- टॉकीज, झी-मराठी, कलर्स मराठी, सोनी मराठी अशा विविध वाहीन्यावर प्रसिध्द असलेले शाहीर रामानंद उगले यांचा महिलांसाठीचा भव्य सांस्कृतीक कार्यक्रम देखील होणार आहे. यामध्ये भारुड, गवळण, पोवाडा, लोकगीताचे सादरीकरण होणार असून सिंगापूर रिर्टन लावणी सम्राज्ञी स्नेहा दुधाळ यांचा परफॉर्मंस देखील होणार आहे. .जगातील पहिल्या सर्प मैत्रिणीची उपस्थिती राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त तसेच जगातील पहिल्या सर्प मैत्रीण आणि सर्प रक्षक असलेल्या वनिता बोराडे यांचीही या कार्यक्रमाला उपस्थिती राहणार असून त्यांच्या माध्यमातून महिलांना मार्गदर्शन होणार आहे.



# झोपेतच सर्पदंश, बहीण भावाचा मृत्यू



**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२४ मे**

धारूर तालुक्यात कोयाळ गावात झोपेतच सख्या बहिण-भावाला सर्पदंश झाल्याने दोघांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून सर्पदंशामुळे सख्या बहिण भावाचा झोपेतच मृत्यू झाल्याने गावकरी हळहळ व्यक्त करतायत.

कोमल मुंडे (वय १५) आणि शिवम मुंडे (वय १२) असे मृत बहिण भावाचे नाव आहे. गेल्या चार दिवसांपासून बीड जिल्ह्यात जोरदार पावसाने हजेरी लावली असून परिसरात सरपटणाऱ्या प्राण्यांमुळे जीवाला धोका निर्माण झालाय. प्रशासनानं नागरिकांना खबरदारीचं आवाहन केलं आहे.

बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यात झोपेतच सर्पदंश झाल्याने सख्या बहिण भावाचा मृत्यू झालाय. ही घटना २४ मे रोजी मध्यरात्री १२ ते १ वाजताच्या सुमारास प्रदीप मधुकर मुंडे यांच्या राहत्या घरी घडली. सख्खे बहिण-भाऊ घरात झोपलेले होते. रात्री उशिरा त्यांना सर्पदंश झाला. सुरुवातीला दोघांनाही काही समजले नाही, परंतु त्यांच्या प्रकृतीत अचानक बिघडल्याने कुटुंबीयांनी तातडीने त्यांना रुग्णालयात नेले. पण तोपर्यंत उशीर झाला होता. रुग्णालयात पोहोचेपर्यंत दोघांचीही प्रकृती अधिकच गंभीर झाली होती. डॉक्टरांनी तपासणी करून उपचार सुरू करण्यापूर्वीच त्यांना मृत घोषित केले. या घटनेने संपूर्ण कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

गेल्या आठवड्यापासून बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाचा जोर आहे. या वातावरणामुळे सरपटणाऱ्या प्राण्यांची हालचाल वाढली असून सर्पदंशाच्या घटना वारंवार घडू लागल्या आहेत. विशेषतः ग्रामीण भागात झोपडी किंवा खुल्या जागेत झोपणाऱ्या नागरिकांना अशा प्रकारांमुळे जिवाला धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने नागरिकांना विशेष सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. घराजवळील जागा स्वच्छ ठेवणे, उंदीर-सरपटणाऱ्या प्राण्यांची वावर होणार नाही याची खबरदारी घेणे, रात्री झोपताना झोपेची जागा नीट पाहणे आणि शक्य असल्यास झोपण्यासाठी उंचावलेली बेड वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# परळीचे सुपुत्र कृष्णगोपाल तोतला यांची महसूल न्यायाधिकरणाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठावर न्यायिक सदस्य म्हणून नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२४ मे**

परळी शहराचे सुपुत्र व ज्येष्ठ न्यायिक अधिकारी श्री. कृष्णगोपाल श्रीनिवास तोतला यांची महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठावर न्यायिक सदस्य (Judicial Member) म्हणून नियुक्ती झाली आहे. महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासनाने २२ मे २०२५ रोजी जारी केलेल्या अधिकृत अधिसूचनेनुसार, ही नियुक्ती महाराष्ट्र भू-राजस्व संहिता, १९६६ च्या कलम ३११ (१) व कलम ३२५ अंतर्गत करण्यात आली आहे.



श्री. तोतला यांनी न्याय क्षेत्रात २८ वर्षांहून अधिक काळ विविध पदांवर कार्य करत न्यायदानाची उज्वल परंपरा पुढे नेली आहे. जिल्हा न्यायाधीश, अतिरिक्त सत्र न्यायाधीश व धर्मादाय आयुक्त अशा महत्त्वाच्या पदांवर त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे.

त्यांच्या या नियुक्तीमुळे छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि अहिल्यानगर या १२ जिल्ह्यांना लाभ होणार असून, या विभागातील न्यायप्रक्रिया अधिक परिणामकारक होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.तोतला यांच्या नियुक्तीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# परळी-धर्मापुरी रस्त्यालगत वाढलेल्या झाडामुळे अपघाताला निमंत्रण; सा.बां. विभागाचे दुर्लक्ष

## वाहने चालवताना नागरिकांनी काळजी घ्यावी-तुळशीराम पवार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ मे**

परळी धर्मापुरी रोडलगत मिरवट दरम्यान रस्त्याच्या कडेला वाढलेल्या झाडामुळे वाहनांचे अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. रस्त्याच्या बाजूला वाढलेली झाडे धोकादायक बनले आहेत. आणि ते अपघातांना निमंत्रण देत आहेत. सदरील रस्त्यावर वाहने चालविताना नागरिकांनी काळजी घ्यावी. या समस्येवर लक्ष वेधून संबंधित विभागाने त्वरित कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

परळी -धर्मापुरी रस्त्याच्या बाजूला वाढलेल्या झाडांमुळे अपघात होण्याची शक्यता दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या वादळी वाऱ्यासह परळी तालुक्यात जोरदार अवकाळी पाऊस बरसत आहे. वाऱ्यामुळे किंवा इतर कारणांमुळे परळी ते मिरवट रस्त्यावर झाड पडल्यास वाहनांना धोका निर्माण होऊ शकतो. सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्यालगत वाढलेली झाडे तात्काळ काढावीत. जर झाड रस्त्यावर पडले किंवा त्याचे फांद्या तुटल्या तर अपघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.



नागरिकांनी रस्त्याच्या बाजूला असलेल्या धोकादायक झाडांबद्दल जागरूक राहून वाहने चालवावीत. तसेच संबंधित विभागाकडे होत असलेल्या अडचणी बद्दल वाहनधारकांनी आपली तक्रार नोंदवावी. याबाबत जनसंग्राम संघटनेच्या वतीने ही संबंधित विभागाला वाहन चालकांना व नागरिकांना होत असलेल्या अडचणी बाबत लवकरच निवेदन देण्यात येणार असल्याचेही जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

धोकादायक झाडे अपघाताला निमंत्रण

परळी -धर्मापुरी मार्गावर मिरवट पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा झाडे मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. गेल्या काही महिन्यांपासून अपघाताला निमंत्रण देत आहे. हे धोकादायक झाडे-झुडपे हटविण्याबाबत ग्रामस्थांनी वेळोवेळी मागणी करूनही त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे एखादा अपघात घडल्यानंतर संबंधित विभागाला जाग येणार का? असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

# परळी शहरात प्रभागनिहाय नालेसफाई व स्वच्छता करून न.प.मार्फत हेल्पलाईन क्रमांकाद्वारे नागरिकांच्या अडचणी सोडवण्याची मागणी-चेतन सौंदळे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२४ मे**

मोसमा आधीच्या पावसानेच परळी शहरातील नाल्या व गटारीतील पाणी रस्त्यावर येवून पाण्याचा निचरा होत नसल्यामुळे नागरिकांना अनेक प्रभागात गैरसोयीचा सामना करावा लागत आहे त्यामुळे नगर परीषदे मार्फत तात्काळ प्रभागनिहाय नालेसफाई व स्वच्छता मोहिमेद्वारे गटारी सांडपाणी वाहिन्यांचे प्रवाहीकरण तसेच नागरिकांच्या अडचणी व तक्रारीचे निवारण हेल्पलाईन क्रमांकाद्वारे करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक चेतन सौंदळे यांनी परळी नगर परीषद मुख्याधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत नगरपालिका प्रशासनाच्यावतीने अधिक्षक श्री.संतोष रोडे यांनी निवेदन स्वीकारून तात्काळ उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आहे.

निवेदनात परळी शहरातील ओढे,मोठया नाल्या व नदीकाठी राहणा-या तसेच शहरी वस्तीभागातील सर्व प्रभागात तात्काळ नालेसफाई व स्वच्छता मोहिम राबवून नागरिकांच्या मुलभूत गरजांकरिता यामध्ये प्रामुख्याने स्वच्छता,पिण्याचे पाणी,पथदिवे,रस्त्यावरील खड्डे बुजविणे तसेच आपत्कालिन परीस्थितीत अडचणी व तक्रारीचे निवारण व्हावे याकरिता नागरिकांसाठी नगरपालिका प्रशासना मार्फत हेल्पलाईन क्रमांकाद्वारे दखल घेण्याची मागणी चेतन सौंदळे यांनी केली आहे.

# भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र राज्यस्तरीय भव्य निबंध स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ मे**

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भव्य ऑनलाइन राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

धर्म, करुणा आणि कर्तृत्वाचे प्रतीक म्हणजे राजमाता अहिल्याबाई होळकर! केवळ एक राजमाता नव्हे, तर समाजहितासाठी झटणारी एक जागृत सेविका होत्या. त्या काशीपासून रामेश्वरापर्यंत त्यांनी मंदिरे, घाट, विहिरी आणि धर्मशाळांची उभारणी केली - त्या केवळ इमारती नव्हत्या, तर संस्कृतीच्या आधारस्तंभ होत्या.

त्यांच्या कार्याचा विस्तार हा केवळ राज्यकारभारापुरता मर्यादित नव्हता, तर त्यात धर्म, न्याय, आणि मानवसेवेचे मूल्य होते. अशा या आदर्श स्त्रीशक्तीला आज आपण मानाचा मुजरा करतो कारण अहिल्याबाई म्हणजे दिव्यतेची आणि नेतृत्वाची जिवंत मूर्ती!

याच दिव्यत्वाला नमन करण्यासाठी त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने भव्य अशा राज्यस्तरीय ऑनलाईन निबंध स्पर्धेचे आयोजन केले आहे.

स्पर्धेची वैशिष्ट्ये

१. भव्य राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

२. मराठी, हिंदी आणि इंग्रजी ही तिन्ही माध्यम

३. भव्य दिव्य पारितोषिके

४. सर्व सहभागींना सहभागीत्व प्रमाणपत्र

५. सर्व वयोगटांना संधी

६. कोणत्याही स्पर्धकाला केवळ एकाच स्पर्धेत भाग घेता येईल.महत्त्वाच्या तारखा

१. दि.२५ मे ते ३० मे २०२५ - नाव नोंदणी आणि दिलेल्या लिंकवर निबंध स्पर्धेचे पीडीएफ पाठविणे.

२. दि. ०५ जून २०२५ वेबसाईटवर निकाल जाहीर

३. पारितोषिक वितरणाची तारीख विजेत्यांना कळविण्यात येईल आणि सहभागींना ३० जून २०२५ च्या आत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येतील.

# दुर्दैवी घटना वगळल्या तर बीड जिल्हा चांगल्या गोष्टीनेच प्रसिद्ध आहे- माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ मे**

बीड जिल्हा कलाकारांची भूमी असून या जिल्ह्यात अनेक नामवंत व्यक्तींनी आपल्या कार्यातून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवलेला आहे काही दुर्दैवी घटना वगळल्या तर बीड जिल्हा चांगल्या गोष्टीने देखील प्रसिद्ध आहे. कचरवाडी सारख्या डोंगर कुशीत जन्मलेल्या एका तरुणाने चित्रपट क्षेत्रात भरभरून यश मिळवले असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.



बीड जिल्ह्यातील कचरवाडी येथील रहिवासी असलेल्या डॉ.महेशकुमार वनवे यांच्या वामा लढाई सन्मानाची या चित्रपटाचे उद्घाटन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते तनिष्का चित्रपटगृहात करण्यात आले. यावेळी आ.विजयराजे पंडित, माजी आ.बदामराव पंडित, ॲड.उषाताई दराडे, सुभाष सारडा, अनिल जगताप, विनोद मुळूक, ज्योतीताई मेटे, अरुण डाके, विलास बडगे, सुधाकर मिसाळ, नितीन धांडे, संगीता धसे, नवनाथ शिराळे, अभय कोटेचा, गौतम खटोड, शुभम धूत, सुहास पाटील आदींची उपस्थिती होती. यावेळी ज्ञानेश्वर वनवे आणि लोकाशा च्या वतीने माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोकाशाचे संपादक विजय बंब यांनी केले तर डॉ.महेशकुमार वनवे यांनी मनोगत व्यक्त करताना आतापर्यंत भोजपुरी सिनेमात काम केले पण मराठी चित्रपट म्हणून आज प्रथमच पदार्पण करत आहे. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे खूप मोठे सहकार्य मला लाभले असून मी मुंबईत गेलो तेव्हा तिथे अण्णांनीच मला आधार दिला माझ्या या यशाच्या मागे माझ्या घरातून पाठबळ असून यापुढे मराठी चित्रपट निर्मितीवर आपला भर असल्याचे त्यांनी सांगितले.

# परळीतील रेल्वे उड्डाणपूल २६ ते ३० मे पर्यंत दुरुस्तीसाठी राहणार बंद


## परळी बायपास रोडचा वाहतूकीसाठी वापर करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२४ मे**

परळी शहरातील श्यामाप्रसाद मुखर्जी रेल्वे उड्डाणपूल दुरुस्तीसाठी २६ मे ते ३० मे यादरम्यान वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे बीड आणि गंगाखेड तसेच परभणी कडे जाणाऱ्या वाहनधारकांनी परळी बायपास रोडचा वापर करावा असे आवहान राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, लातूर यांनी केले आहे.

परळी शहरातील शाममुखर्जी उड्डाणपूल हा अनेक दिवसापासून दुरुस्त करावा तसेच पूलाचे रुंदीकरण करावे अशी मागणी होत होती. पूलावरील नेहमी पडणा-या खड्ड्यामुळ दुरुस्ती करणे आवश्यक होते. दुरुस्तीचे हे काम २६ मे पासून सुरुवात होणार असून दुरुस्तीसाठी अडथळा निर्माण होऊ नये व काम करताना अपघात होऊ नये यासाठी वाहतूक व्यवस्था टोकवाडीवरून परळी कडे वळवण्यात येणार आहे. तरी वाहनधारकांसाठी पर्यायी मार्ग म्हणून परळी बायपास या मार्गाचा वापर करण्यात येणार आहे. शाममुखर्जी उड्डाणपूलावर नेहमीच वाहतूक कोंडी होत होती.यामुळे समाज माध्यमातून मोठ्या प्रमाणात नाराजी चा सूर येत होता.

२६, ते ३०मे पर्यंत परळी कडे येणाऱ्या सर्व वाहनधारकांनी टोकवाडी, कनेरवाडी, परळी या दिशेने मार्ग खुला राहणार आहे. बीड तेलगाव मार्गे येणाऱ्या तसेच परभणी गंगाखेड कडून परळीला येणाऱ्या अंधारकांनी परळी बायपास रोडचा वापर करावा असे आवाहन राष्ट्रीय महामार्ग उपविभाग,लातूरचे उपविभागीय अभियंता श.म.उरगुंडे यांनी केले आहे.



येथील रामतिर्थ संस्थानचे मठाधिपती विद्या महाराज जोशी खडकीकर यांच्या मुलीच्या विवाह शनिवारी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड येथे आस्थिरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन


**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ मे**

जैन सोशल फेडरेशन, अहमदनगर संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल, जालना रोड, शाहू बँकेजवळ, बीड येथे रविवार, दिनांक २५ मे रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत आस्थिरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबीरामध्ये मनके व सांधे बदली, गुडघेदुखी, पाठदुखी, कंबरदुखी यांसारख्या अस्थिरोगांवर तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत. महागड्या वैद्यकीय सेवेमुळे सर्वसामान्य रुग्णांना अडचण येऊ नये यासाठी अत्यल्प दरात उच्च दर्जाची सेवा देण्याचा उद्देश या शिबीरामागे आहे.

या शिबीरात संपूर्ण गुडघा व खुबा प्रत्यारोपण फक्त ६५,००० रुपये या किमतीत, गुणवत्तापूर्ण इम्प्लांटसह उपलब्ध असणार आहे. तसेच 'महा फुले जन आरोग्य योजना' अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे.शिबीरात प्रसिद्ध अस्थिरोग सर्जन डॉ. रोहन धोत्रे (अहमदनगर) व त्यांच्या सहकारी तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. तपासणीसाठी नोंदणी शुल्क केवळ १०० रुपये ठेवण्यात आले असून, मो. ८२६२००९०९१ या क्रमांकावर संपर्क साधून नोंदणी करता येईल. वेळेअभावी नोंदणी करू न शकलेल्या रुग्णांचीही तपासणी केली जाणार आहे.सर्व बीडकर व परिसरातील नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सकल जैन समाज, बीड यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# गुरुमाऊली कॉलेज ऑफ नर्सिंग येथे जागतिक परिचारिका दिन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान समारंभ




**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२४ मे**

संपूर्ण जगामध्ये स्वास्थ्य व्यवस्थेतील परिचारिकांचे उल्लेखनीय महत्त्व व अतुल्य योगदान याची दखल घेण्यासाठी इसवी सन १८५४ पासून जागतिक परिचारिका दिन हा साजरा करण्यात येतो. यावर्षी गुरुमाऊली कॉलेज ऑफ नर्सिंग माजलगाव येथे जागतिक परिचारिका दिन, शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना या विशेष दिनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले गेले यामध्ये विद्यार्थ्यांना मान्यवरांचे अनमोल मार्गदर्शन लाभले तसेच त्यानिमित्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाद्वारे घेण्यात येणाऱ्या बीएससी नर्सिंग च्या प्रथम वर्षाच्या प्रथम सत्र परीक्षेचा निकाल नुकताच लागला या मधे महाविद्यालयाच्या ७५ टक्के निकाल लागला व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. अभ्यासक्रमाच्या पहिल्याच वर्षी कठीण परिस्थितीशी सामना करत ध्येय आणि चिकाटीच्या जोरावर विशेष प्राविण्य घेत अनुक्रमे प्रथम क्रमांक निकिता राठोड द्वितीय क्रमांक आकांक्षा भालेराव तृतीय क्रमांक आरती नागरगोजे या विद्यार्थ्यांना विशेष सन्मान करण्यात आला या कार्यक्रमासाठी गुरुकृपा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ.यशवंतराजे भोसले प्राचार्य निर्मला मॅडम फार्मसी प्राचार्य अमित बिंदू सर उपप्राचार्या पूनम खानापूरकर आदी मान्यवर उपस्थित होते

### टी.सी.हरवला आहे

नामे प्रल्हाद रमेश जगताप १२ वी (विज्ञान) पास चा टी. सी.माजलगाव तालुक्यतील सावरगाव बस स्थानक येथून हरवला आहे. कृपया सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्क
मोबाईल क्रं.८२०८११४३७४

# ऑल इंडिया सैनिक स्कूल परीक्षेत राजवीर घुगे चे सुयश



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ मे**

ऑल इंडिया सैनिक स्कूल परीक्षा २०२५ चा निकाल नुकताच लागला असून या परीक्षेत राजवीर मुकुंदराज घुगे या विद्यार्थ्याला ३०० पैकी २५८ गुण मिळाल्यामुळे या विद्यार्थ्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे याबद्दल अधिक माहिती अशी की भारत सरकारकडून राष्ट्रीय परीक्षा एजन्सी अंतर्गत ऑल इंडिया सैनिक स्कूल एजन्सीने २०२५ मध्ये इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात आली होती या परीक्षेचा निकाल नुकताच लागला असून बोरफडी येथील रहिवासी वडवणी येथील घुगे ज्वेलर्स चे मालक मुकुंदराज सूर्यभान घुगे यांचा मुलगा राजवीर घुगे या विद्यार्थ्याला ३०० पैकी २५८ गुण मिळाल्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे सादरील विद्यार्थी सहावी वर्गात जिल्हा परिषद शाळा सोन्ना खोटा येथील शाळेत शिक्षण घेत घेत आहे शाळेचे मुख्याध्यापक एस आर मुंडे गोरख मुंडे मीरा गायकवाड ओमकार ढगे रेश्मा कांबळे मंदाकिनी डांगे महादेव लांडगे प्रकाश चाटे बाबुराव कांबळे नवनाथ घुगे नितीन बोखारे विष्णू आंधळे पवन आरसेवाड अंगद मददेवाड सह सर्व शिक्षक कर्मचारी वर्गाचे मार्गदर्शन लाभले आहे त्याच्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे